MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा



वर्ष तेवीसावे/अंक ३/मार्च २०२२

## संपादकीय

### राष्ट्रीय विज्ञान दिनाचे पडसाद

२८ फेब्रुवारी रोजी देशभर 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा करण्यात आला. विज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा यासाठी जे वेगवेगळे प्रयत्न केले जातात त्याचाच हा भाग आहे. १९८७ पासून हा दिवस राष्ट्रीय स्तरावर साजरा केला जात आहे. यासाठी फेब्रुवारीची २८ तारीखच का निवडली हा प्रश्न अनेक शाळा-कॉलेजच्या शिक्षकांना पडतो. याचे कारण ही तारीख समारंभाच्या दृष्टीने त्यांना गैरसोयीची वाटते. फेब्रुवारी महिना आला की शैक्षणिक सत्र संपण्याचे वेध लागतात. वर्षभर शिकवण्याचे काम करून झाल्यानंतर शिक्षक मूल्यमापनाचे नियोजन करू लागतात. विद्यार्थी देखील परीक्षेची तयारी करण्यात मग्न होतात. अशा वेळेस एखादा समारंभ करायचा म्हणजे त्यांना अडचणीचे जाते. असे असून देखील २८ फेब्रुवारी हीच तारीख राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून निवडली गेली. याचे कारण या तारखेचे भारताच्या वैज्ञानिक प्रगतीत असलेले महत्त्वाचे स्थान.

२८ फेब्रुवारी १९२८ रोजी सर चंद्रशेखर व्यंकट रमन यांना एक महत्त्वाचा शोध लागला. कोलकत्त्याच्या इंडियन असोसिएशन फॉर दि कल्टिवेशन ऑफ सायन्स (Indian Association for the Cultivation of Science) या संस्थेत ते आणि त्यांचे सहकारी श्री कृष्णन हे काम करीत होते. एखाद्या परावर्तनीय पृष्ठभागावर पडलेल्या प्रकाशाचे नेमके काय होते हे समजून घेण्याचा ते प्रयत्न करत होते. तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की, परावर्तित प्रकाशकिरण बऱ्याच अंशी आहे त्याच तरंगलांबीचे असतात. परंतु काही परावर्तित प्रकाश किरण मात्र वेगळ्या तरंगलांबीचे असतात. हे वेगळेपण परावर्तनासाठी जो पदार्थ वापरला त्यावर अवलंबून असते असे त्यांच्या लक्षात आले. हे अतिशय महत्त्वाचे संशोधन होते, यालाच 'रामन परिणाम' असे म्हणतात. याच कामासाठी १९३० सालचे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक रामन यांना देण्यात आले. विज्ञानाच्या क्षेत्रात एका भारतीय माणसाला मिळालेले हे पहिलेच नोबेल पारितोषिक होते. त्यामुळे या दिवसाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळेच या तारखेला 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा करण्यात यावा असे ठरविण्यात आले.

२०२० मार्चपासून कोविड महामारीच्या प्रसारामुळे सगळ्याच शैक्षणिक संस्था बंद होत्या. त्याआधी २०२०चे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरे करण्यात आले. मात्र पुढच्या वर्षी महामारीचा प्रकोप सर्वत्र पसरला असल्याने राष्ट्रीय विज्ञान

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

दिन मोठ्या प्रमाणावर साजरा करता आला नाही. काही संस्थांनी ऑनलाइन व्याख्यानाची व्यवस्था केली होती. यावर्षी महामारीचे रौद्र रूप जरा कमी झाले. त्यामुळे बऱ्याच शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक वर्षी विज्ञान दिनासाठी एक विषय दिला जातो. यावर्षीच्या राष्ट्रीय विज्ञान दिनासाठी दिलेला विषय होता, 'शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान याची जोड' (Integrating Science and Technology for Sustainable Development). या विषयाला धरून अनेक प्रकारचे कार्यक्रम करण्यात आले होते. त्यामध्ये प्रश्न मंजुषा, विज्ञान प्रदर्शन, व्याख्याने अशा कार्यक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाचा उद्देश असा होता की, या निमित्ताने समाजापर्यंत शाश्वत विकासाची माहिती पोहोचेल आणि त्यासाठी काय करण्याची गरज आहे याची जाण त्यांना येईल. यादृष्टीने केलेल्या कार्यक्रमाचे फलित काय असा आपण विचार करू लागलो तर आपल्या लक्षात येईल की, शास्वत विकास ही संकल्पनाच अनेकांना समजलेली नाही.

साधारणपणे सतराव्या शतकात औद्योगिक क्रांती झाली. या क्रांतीचा भार पृथ्वीच्या पोटात असलेल्या इंधनावर आधारित होता. कोळसा जाळून मिळवलेल्या उष्णतेने पाणी तापवायचे आणि त्यातून मिळालेल्या वाफेवर इंजिन चालवायचे असा तो प्रकार होता. कालांतराने या इंधनाचा उपयोग करून वीज बनवता येते हे लक्षात आले. त्यानंतर जैविक इंधनाच्या उपयोग करून वाहने चालवता येतात हे कळले. जसजशी औद्योगिक प्रगती होत गेली तसतशी या इंधनाची गरज वाढत गेली. ती पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांचा उपसा होऊ लागला. त्यामुळे या इंधनाचा साठा कमी कमी होत गेला. हा साठा किती वर्षे टिकेल याची काळजी विचारवंतांना वाटू लागली. याहीपेक्षा महत्त्वाचे असे की, या इंधनाच्या ज्वलनाने निर्माण होणारे जे वायू आहेत ते हवेत पसरू लागले. या वायूच्या आच्छादनाने हरितगृह परिणाम दिसू लागला. त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढू लागले आणि बर्फाच्या रूपात असलेल्या पाण्याचे द्रवात रूपांतर होऊ लागले. असे झाल्याने समुद्राची पातळी वाढत गेली. त्यामुळे ज्या बेटांची उंची समुद्रसपाटीपासून फारच कमी आहे ते लवकरच पाण्याखाली जातील अशी भीती निर्माण झाली. या सगळ्यांचा विचार करता असे लक्षात आले की, ज्या प्रगतीच्या मार्गाचा आपण अवलंब केला तो शाश्वत नाही. जर आपल्याला शाश्वत विकासाचा मार्ग घ्यायचा असेल तर आपल्याला जैविक इंधनाचा वापर कमी करून इतर अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा विचार केला पाहिजे. यामध्ये सौरऊर्जा, पवन ऊर्जा किंवा दुसरा कोणताही स्रोत ज्याचे पुनरुज्जीवन होत असते असा आपल्याला शोधावा लागेल. असा प्रयत्न वैज्ञानिक आधीच करू लागलेले आहेत. तरीही ही जाण सर्वसामान्य लोकांना व्हावी यासाठी यावर्षी प्रयत्न करण्यात आले. आपण सध्या स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत. त्याचे निमित्त साधून देशात अनेक ठिकाणी राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला. काही ठिकाणी तर हे एक आठवडाभर चालले होते. असे जरी असले तरी सर्वसामान्य जनतेपर्यंत शाश्वत विकासाच्या बाबी पोहोचल्या असतीलच असे खात्रीने म्हणता येत नाही. त्यासाठी वर्षभर प्रयत्न करावे लागणार आहेत. ज्या शैक्षणिक संस्थांनी हे प्रयत्न सुरू केलेत त्यांनी ते असेच सुरू ठेवावेत असे आवाहन मी या निमित्ताने करू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेवीसावे/अंक ३/मार्च २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक ९ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे डॉ. विजय बेडेकर यांचे योगदान | मुलाखत : प्रा. नारायण बारसे | ३ |
| ३) | सिंधुदुर्गची अविस्मरणीय भेट | सौ. शोभा आगरकर | ६ |
| ४) | श्रीराम : चारित्र्य-मंजिरी | डॉ. हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर | ९ |
| ५) | तिळगूळ घ्या, गोड बोला | चन्द्रशेखर टिळक | १० |
| ६) | चित्रपट-कर्त्याने केवळ नव-निर्मितीच करायला हवी का? - सत्यजित राय | शंकरराव ब्रह्मे | १४ |
| ७) | वेळणेश्वर भेट | प्रा. विनोद एच. वाघ | १७ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे
# डॉ. विजय बेडेकर यांचे योगदान

*ठाण्याच्या प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या भारतीय संस्कृती, परंपरा व संस्कृत भाषा प्रचाराचे मोलाचे योगदान देणाऱ्या संस्थेच्या कार्याची दखल घेणारा लेख - संपादक*

प्राच्यविद्या अभ्यास संस्था ही प्रामुख्याने भारतीय संस्कृती, रीतिरिवाज, परंपरा, मूल्ये, विचारधारा व संस्कृत भाषा यांचा अभ्यास व प्रचार करणारी संस्था आहे. ठाण्याचे ज्येष्ठ संशोधक आणि विचारवंत डॉ. विजय बेडेकर यांनी या संस्थेची स्थापना १९८३ केली. गेली ३८ वर्षे प्राच्यविद्याविषयक अभ्यास आणि संशोधनाचे या संस्थेचे कार्य व्यापक स्वरूपात अव्याहतपणे सुरू आहे.मानवी संस्कृतीचा अभ्यास व मानवाच्या अस्तित्वाकरिता लागणाऱ्या सर्व घटनांचा यांमधे समावेश होतो. इतिहास या विषयाचा संस्थेत अभ्यास होत असला तरी इतिहासापुरतेच संस्थेचे कार्य मर्यादित नाही. प्राच्यविद्येच्या अभ्यासाची व्याप्ती अधिक विशाल व इतर, इतिहासासारख्याच मानववंश, भूगोल, समाजशास्त्र अशा अनेक विषयांच्या संयुक्त अभ्यासाशी निगडित आहे. या अभ्यासकरिता प्रामुख्याने लागणाऱ्या दोन सोयी म्हणजे संदर्भ ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय. प्राच्यविद्या संशोधनासाठी पूरक अशी संदर्भ साधने आणि साहित्य संग्रहित करण्याचे मोठे काम या संस्थेच्या माध्यमातून ठाण्यात उभे राहिले आहे. भारतीय संस्कृती ही जगात जुनी व आपले अस्तित्व टिकवून ठेवलेली संस्कृती आहे. म्हणूनच हा विषय म्हणजे नुसता घटनांचा, क्रमाचा, राजा, व्यक्ती व भौगोलिक सीमा असलेल्या देशाच्या विजयाचा वा पराजयाचा अभ्यास नसून, संपूर्ण मानवजात व निसर्ग यांचे अस्तित्व, विकास व संतुलन यांसाठी कारणीभूत झालेली मनोसामाजिक कारणे व परिस्थिती यांचा अभ्यास आहे.

ठाण्याच्या हाजुरी भागातील एका तीन मजली मोठ्या इमारतीमध्ये प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचा फार मोठा खजिना अभ्यासकांसाठी उपलब्ध आहे. संस्थेच्या संग्रहालय विभागात १०-१२व्या शतकापासूनच्या अनेक मूर्ती, हजार वर्षांपूर्वीचे ताम्रपट, विजयनगर साम्राज्याचा एक मराठी शिलालेख, सातवाहन काळातील पाटा-वरंवटा, शिलाहारकालीन स्थापत्याचे व शिल्पाचे अनेक नमुने, अनेक दुर्मीळ वस्तू, असंख्य पुरातन नाणी, हजारो हस्तलिखिते, पोथ्या, बखरी, भांडी-कुंडी, अवजारे, कोरीव लेख, पुराणे आदी अनेक पुरातन व दुर्मीळ गोष्टींचा त्यात समावेश आहे. ठाणेकर आणि अभ्यासकांच्या दृष्टीने हे मोठे वैभव आहे.

ठाणे महापालिकेचे माजी आयुक्त गोविंद स्वरूप व सध्याचे आयुक्त संजीव जयस्वाल यांनी संस्थेची भागविलेली सोयी-सुविधांची गरज अत्यंत मोलाची म्हणावी लागेल. डॉ. विजय बेडेकर हे केवळ पुण्याच्या भांडारकर इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळावर नसून, पॅरीसच्या लूरपासून ते न्यू यॉर्कच्या मेट्रोपोलिटियन म्युझियमपर्यंतच्या जगातील अनेक संस्थांचे सन्माननीय सभासद आहेत. त्यांनी या संस्थेला जगात मानाचे स्थान मिळवून दिले, असे म्हणावे लागेल.

प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या ग्रंथसंग्रहात १६५१ साली प्रकाशित झालेले श्री गीतगोविन्दम, पदार्थविज्ञानशास्त्र (१८५७), बालरामायणम (१८६९), शब्दव्युत्पत्तिकौमुदी (१८७२), श्री भाषामंजरी संस्कृत व प्राकृत (१८७४), विविध प्रकारचे कोश, निरनिराळे

शब्दकोश, गॅझेटीअर, नामवंत संस्थांची नियतकालिके, परदेशात प्रकाशित झालेली विविध वर्तमानपत्रे आणि मासिके, तसेच साडेतीन हजारांहून अधिक हस्तलिखित पोथ्या, जसे स्वात्म बोध (१५७१), आश्वलायन स्मृती (१६२०), शाकुंतल नाटक (१६४४), श्राद्ध विधी (१७२१), भीष्म तर्पण (१६९३), प्रायश्चित प्रदीप (१७३३), परभू कथा (१७५०), शक्ती संगम (१७५९), श्रीमद् भगवत् गीता (१८३०), लिलावती (१८४७), ताडपत्र व काही पुरातन वास्तू व शिल्पे, जुनी नाणी, पोर्तुगीजकालीन रांजण, शिलालेख संस्थेजवळ आहेत.

प्राच्यविद्या अभ्यास संस्थेने संस्थेने गेल्या ३८ वर्षांत भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांचा ऊहापोह करणाऱ्या ३४ आंतरराष्ट्रीय परिषदा भरविल्या. देशातील सुमारे ७०० व परदेशातील १०० च्या वर अभ्यासकांनी आपले शोधनिबंध या परिषदांमधून वाचले. प्राच्यविद्याविषयक व्यापक चर्चा व अभ्यासपूर्ण शोधनिबंध आणि परिषदेसाठी निवडलेल्या विषयाचा ऊहापोह करणारे नामवंत अभ्यासकाने दिलेले बीजभाषण ही या सर्वच परिषदांची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये असत. आर्थिक अडचणीपोटी संस्था सर्व गोष्टी प्रकाशित करू शकली नसली तरी भारताबाहेरील संस्कृत अध्ययन-अध्यापन, प्राचीन व मध्ययुगीन भारतातील शिक्षणव्यवस्था ही पुस्तके संस्थेने प्रकाशित केली असून अन्य गोष्टी सारांशरूपाने उपलब्ध आहेत. अभ्यासकांसाठी हा फार मोठा खजिना आहे.

संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांच्या निमित्ताने अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधक आणि विचारवंतांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेला आणि ठाणे शहराला भेटी दिल्या आहेत. संस्थेने अनेक शैक्षणिक उपक्रमांसोबत व्याख्याने, ग्रंथ प्रदर्शने, शिक्षक व विद्यार्थी देवाण-घेवाण इ. कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. तसेच संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अभ्यास-दौरे आणि शैक्षणिक सहलींचे आयोजन केले होते. या सहलींमध्ये विविध ठिकाणची देवळे, ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये , ऐतिहासिक वास्तू इत्यादींना भेटी दिल्या आहेत. तमिळनाड, कच्छ व गुजरात, पैठण-तेर-नाशिक, कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, ओरिसा व राजस्थान आदी ठिकाणांच्या अभ्यासदौऱ्यांचा त्यात समावेश होता.

१९८४ मध्ये फिलाडेल्फिया अमेरिका येथे भरलेल्या सहाव्या जागतिक सांस्कृतिक परिषदेकरिता संस्थेने २५ प्रतिनिधी येथून पाठविले होते. १९९० मध्ये व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथे भरलेल्या आठव्या, १९९४ साली मेलबर्न (ऑस्ट्रेलिया) येथे भरलेल्या नवव्या, २००० मध्ये तुरिनो इटली येथे भरलेल्या जागतिक संस्कृत परिषदेला तर २००६ मध्ये एडिंबरो (यु.के.) येथे भरलेल्या १३ व्या जागतिक संस्कृत परिषदेला डॉ. विजय बेडेकर उपस्थित होते. २००२ मध्ये अफगाणिस्तानच्या दौऱ्यात संस्थेमार्फत अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सहभागी झाले होते.

२००३ पासून एल. ई. सी. टी. (लीग ऑफ एक्स्चेंज ऑफ कॉमनवेल्थ टीचर्स) व प्राच्यविद्या अभ्यास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ब्रिटिश शिक्षकांचा, भारतीय प्राथमिक व माध्यमिक शिक्षणपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी शाळांच्या भेटीचे आयोजन केले होते. २००३ ते २००७ या कालावधीत सुमारे १५० ब्रिटिश शिक्षकांनी या योजनेअंतर्गत भेटी दिल्या. २००४ सालापासून भारतीय शिक्षकांनीही ब्रिटिश शिक्षणपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडमध्ये जाऊन ब्रिटिश शिक्षण संस्थांना भेटी दिल्या. सुमारे ५० भारतीय शिक्षकांनी लंडन, ऑक्सफर्ड, वेस्ट सक्सेस व बर्मिंगहॅम या शहरांतील शाळांना भेटी दिल्या. २००५ सालापासून विद्यार्थ्यांसाठी ऑक्सफर्ड, केम्ब्रिज व लंडन येथील महाविद्यालये, ग्रंथालये, संग्रहालये व भारतीय संस्कृती आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित स्थळांना भेटी दिल्या.

चीनमधील युनान प्रांतातील कुनमिन या गावात चीन सरकारतर्फे आयोजित केलेल्या शालेय विज्ञान प्रदर्शनात ठाण्यातील ए. के. जोशी (आनंदीबाई जोशी) इंग्रजी शाळेच्या चार विद्यार्थ्यांचा सहभाग होता. विद्यार्थी व शिक्षकांसाठी सांस्कृतिक व शैक्षणिक अभ्यास-दौरे आयोजित करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव संस्था असावी. संस्थेने आजवर २०हून अधिक प्रदर्शने, व्याख्यानमाला, बैठका, शिबिरे, चित्रपट महोत्सव, सत्कार समारंभ आयोजित करून नागरिकांच्या ज्ञानकक्षा वाढवण्याचा प्रयत्न केला. १५०च्या वर देशातील व परदेशातील २०वर अभ्यासकांची विशेष व्याख्याने आयोजित करून केलेला प्रयत्न स्तुत्य होता.

संस्थेच्या कार्याची दखल घेऊन अनेक मान्यवर व्यक्तींनी आपली ग्रंथसंपदा विश्वासाने प्राच्यविद्या अभ्यास संस्थेकडे सुपूर्त केली आहे आणि या ग्रंथसंपदेचा लाभ अनेक विद्यार्थी व संशोधक घेत आहेत. प्रसिद्ध अमेरिकन मानसोपचार तज्ज्ञ, कवी, संगीतकार श्री. फ्रँकलिन आबोट यांनी आपल्या संग्रहातील ११०० उपयुक्त ग्रंथ स्वखर्चाने ठाणे येथे अलीकडेच पोहोचते केले आहेत. फ्रँकलिन आबोट यांनी पाठवलेली ग्रंथसंपदा ठाण्यात आल्यानंतर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आणि प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे संचालक डॉ. विजय बेडेकर यांनी या सर्व संग्रहाचे अभ्यासपूर्ण अवलोकन केले. या ग्रंथसंपदेची विषयव्याप्ती आणि संशोधनमूल्य लक्षात घेऊन ही ग्रंथसंपदा विद्यार्थी, इतिहास संशोधक, प्राच्यविद्या संशोधक, तसेच विविध विषयांत एम फील आणि विद्यावाचस्पती अभ्यासासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे डॉ. बेडेकर यांच्या लक्षात आले. आणि म्हणूनच संपूर्ण ठाणेकर वाचक संशोधकांना ही ग्रंथसंपदा खुली करून देण्याच्या उद्देशाने डॉ. बेडेकर यांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या ग्रंथालयात एक विशेष संग्रह दालन तयार केले आहे. आबोट यांच्याकडून प्राप्त झालेल्या या संग्रहात मानसशास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान, फोटोग्राफी, संगीत, साहित्य, इतिहास, भूगोल इत्यादी विषयांच्या ग्रंथांचा समावेश आहे. स्पिरीट ऑफ एशिया, द कम्पलीट बुक ऑफ स्क्रिप्टराइटिंग, क्राफ्ट ऑफ कश्मीर जम्मू ऐण्ड लदाख, फोक सोन्ग्स ऑफ द वर्ल्ड, महाराजा रंजीत सिंग एज पेट्रोन ऑफ द आर्ट्स, मैजिक बॉल्स, पोयेट्स इन देयर यूथ, द गार्डन ऑफ लाईफ, अन ईन्ट्रोडक्शन टू द हिलींग प्लानट्स, अ डिस्टेंट मिरर, वास्तू, द एनसाक्लोपिडिया ऑफ साईन्स अँड सिंम्बॉल्स, मोशनलेस जर्नी फ्रॉम अ हेर्मिटेज ईन द हिमालयास, अ हिस्ट्री ऑफ फार ईस्टर्न आर्ट, आर्ट ऑफ ऐशिया, प्याराडाईज ऑन अर्थ इत्यादी अतिशय महत्त्वपूर्ण ग्रंथांचा यात समावेश आहे.

संस्थेच्या कार्याची दखल घेऊन दाभोळचे अण्णा शिरगावकर यांनी आपल्या संग्रहातील अनेक दुर्मीळ ग्रंथ, ऐतिहासिक मूल्य असलेल्या वस्तू व साडेतीन हजारांवर हस्तलिखित पोथ्या या संस्थेच्या संग्रहालयाकडे मोठ्या प्रेमाने व विश्वासाने सोपवल्या आहेत.

दुर्मीळ पुस्तकांच्या शोधार्थ आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संशोधकही येथे येऊन गेले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणानुसार इतिहास व समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना काही प्रकल्प हाती घ्यावे लागतात. त्यामुळे महाविद्यालयीन तरुण विद्यार्थ्यांची पावलेही इकडे वळू लागली आहेत. मुंबई विद्यापीठाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. मोराझ, मानव्यशास्त्राचे प्रमुख डॉ. पंढरीनाथ प्रभू, गोव्याचे स्वातंत्र्योत्तर पुरातत्त्व विभागाचे डॉ. अर्जुन-वाडकर, मो. दि. पराडकर, रा. चिं. ढेरे, वा. ल. मंजुळ, जर्मन संशोधक श्री. सरमा इ. विद्वानांनी भेट देऊन संस्थेच्या कामाचे कौतुक केले आहे. अनेक नामवंत संशोधकांना येथे अभ्यास करावा असे वाटते यातच संस्थेचे महत्त्व अधोरेखित होते. प्राच्यविद्या

(पृष्ठ क्र.८ वर)

# सिंधुदुर्गची अविस्मरणीय भेट

*सिंधुदुर्ग किल्ल्याला दिलेल्या भेटीचे वर्णन या लेखात केले आहे. - संपादक*

आम्ही शाळेत शिकत असताना सिंधुदुर्ग या किल्ल्याबद्दल आम्हाला माहिती देण्यात आली होती. हा किल्ला समुद्रात असून त्याची निर्मिती शिवाजी महाराजांनी केली एवढीच माहिती माझ्याकडे होती. २०१० मध्ये या किल्ल्याला भारत सरकारने 'महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले असे मी वाचले होते. त्यामुळे या किल्ल्याबद्दल एक मोठे कुतूहल मनात होते. हे कुतूहल शमण्याची संधी फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात मला मिळाली. या आठवड्यात कोकण फिरण्यासाठी म्हणून आम्ही मालवणला गेलो. तिथून जवळच हा किल्ला आहे. त्यामुळे या किल्ल्याला भेट देण्याचा कार्यक्रम आखण्यात आला. समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर समुद्रात एका बेटावर हा किल्ला बांधलेला आहे. तिथे पोहोचण्यासाठी बोटीने जावे लागते. त्याची व्यवस्था मालवण शिवशक्ती जलपर्यटन चालक मालक संस्थेने केली आहे. त्यांच्या बोटी ठरावीक वेळाने किल्ल्याकडे जात असतात. त्यासाठी प्रति प्रवासी १०० रुपये शुल्क आकारतात. योग्य ते शुल्क भरून आम्ही बोटीत जाऊन बसलो. साधारणपणे अर्ध्या तासाचा तो प्रवास असेल. दुरून किल्ला फार लहान दिसतो. परंतु जसजसी आमची बोट किल्ल्याजवळ जात होती तसतशी किल्ल्याची भव्यता आम्हाला जाणवू लागली.

बोटीने आम्हाला किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ सोडले. प्रवेशद्वाराची रचना अशी आहे की, त्याची आपल्याला पटकन जाणीव होत नाही. जरा वळसे घेऊन



**किल्ल्याचे जवळून दर्शन**

किल्ल्याच्या आत प्रवेश करावा लागतो. आतला परिसर खूप मोठा आहे. फिरायला सोयीचे व्हावे म्हणून एक रस्ता बांधलेला असून महत्त्वाची बहुतेक ठिकाणे याच रस्त्यावर आहेत. पर्यटकांच्या सोयीसाठी रस्त्यावर मध्येमध्ये चहा पाण्याची आणि शीतपेयाची सोय करणारी उपहारगृहे आहेत. प्रवेशद्वारातून आत जाताच हनुमानाचे मंदिर नजरेस पडते. हे मंदिर किल्ल्याच्या बांधकामाच्या वेळेसच बांधलेले आहे आणि ते आजही चांगल्या अवस्थेत आहे. आपण पुढे गेलो की आपल्याला एक भव्य इमारत दिसते. ही इमारत शिवमंदिर स्मारकाची आहे. ज्या दिवशी आम्ही गेलो त्या दिवशी या मंदिराच्या दुरुस्तीचे काम चालू होते. त्यामुळे आम्हाला आत जाऊन शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे दर्शन घेता आले नाही. परंतु तिथल्या एका व्यक्तीने आम्हाला असे सांगितले की, शिवाजी महाराजांचे दुसरे पुत्र राजाराम महाराज यांनी १६९५ मध्ये हे मंदिर बांधले. या मंदिरात शिवाजी महाराजांची जी मूर्ती आहे ती इतर ठिकाणी आपण ज्या मूर्त्या पाहतो त्याहून जरा वेगळी आहे.

येथील महाराज हे कोळ्याच्या वेशात असून दाढी नसलेली त्यांची ही प्रतिमा आहे असे त्यानी सांगितले.

आम्ही मार्गक्रमण करत पुढे गेलो. जवळच आम्हाला एक शिवमंदिर लागले. त्यात आतून एक भुयारी मार्ग गेल्याचे दिसते. आता तो मार्ग एका तटबंदीने बांधून ठेवलेला आहे. ते पाहून आम्ही बाहेर पडलो आणि पुढे चालू लागलो. या प्रवासात आम्हाला तीन विहिरी दिसल्या. जुन्या काळातील पायऱ्या पायऱ्याच्या जशा विहिरी असतात तशाच या विहिरी आहेत. आम्हाला असे कळले की, या विहिरीतील पाणी प्यायला गोड आहे. आजूबाजूला समुद्र असताना केवळ या बेटावरील पाणी गोड कसे? असा प्रश्न आमच्या मनात आल्यावाचून राहिला नाही. त्याचे उत्तर अर्थातच तिथे मिळणे अशक्य होते म्हणून आम्ही प्रश्न मनात ठेवून मार्गक्रमण करीत राहिलो.



गोड्या पाण्याची विहीर

एके ठिकाणी दोन मार्ग फुटतात. एक जातो भवानी देवी मंदिराकडे आणि दुसरा जातो दगडी उंचवट्याकडे. आम्ही प्रथम भवानी देवी मंदिराकडे जाऊन तिथल्या देवीचे दर्शन घेतले. नंतर त्या उंचवट्याकडे आम्ही गेलो. वर जाताच लांबवरचे दृश्य स्पष्ट दिसते. शत्रू सैन्याचा मागोवा घेण्यासाठी हा उंचवटा बांधला असावा असे वाटते. साधारणपणे तीन तास वेळ आम्ही किल्ल्यात घालवला. त्यानंतर बोटीने आम्ही मालवण धक्क्याला परत आलो. धक्क्याजवळ आता एक सुंदर इमारत बांधण्यात आली आहे. ते एक सभागृह असावे असे वाटते. परिसर सुशोभित करणारी अनेक कामे त्या भागात सुरू आहेत.



मालवण जेट्टीजवळ केलेले नवीन बांधकाम

ज्या किल्ल्याला भेट दिली तो सुमारे ३५० वर्षे जुना आहे. इसवीसन १६६४ मध्ये तो बांधायला घेतला. तीन वर्ष बांधकामाचे काम सुरू होते. साधारणपणे ४७ एकर एवढी जागा या किल्ल्याने व्यापली आहे. त्यासाठी सुमारे तीन किलोमीटर एवढ्या लांबीची तटबंदी बांधावी लागली. आपले आरमार प्रभावी असावे असे शिवाजी महाराजांना वाटायचे. त्यासाठी त्यानी सह्याद्रीच्या डोंगरात अनेक किल्ले बांधून घेतले. त्याचबरोबर समुद्राकडून होणाऱ्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी समुद्रातच किल्ला असला पाहिजे असे त्यांना वाटले. त्यानुसार त्यानी काही किल्ले समुद्रात बांधले. जेव्हा मालवण जवळ समुद्रात किल्ला बांधायचा निर्णय घेतला तेव्हा त्यासाठी योग्य जागा शोधण्याचे काम त्यानी हाती घेतले. त्यासाठी त्यानी स्थानिक कोळ्यांना मदतीला घेतले. त्यांनी किनाऱ्याजवळच असलेले कुरटे नावाचे बेट किल्ल्यासाठी योग्य राहील असा निर्वाळा दिला. एकदा ठिकाण ठरवल्यावर महाराजांनी २५ नोव्हेंबर १६६४ रोजी बांधकामाचे पूजन केले आणि हिरोजी इंदूलकर यांच्यावर बांधकामाची जवाबदारी सोपवली. त्यांनी मन

लावून हे काम केवळ तीन वर्षात पूर्ण केले. त्या काळात किल्ल्याच्या बांधकामाला सुमारे एक कोटी होन एवढा खर्च आला. किल्ला आता पाहताना शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे कौतुक केल्यावाचून राहावत नाही. अनेक वर्षे ऊन, पाऊस याच्या माराने बऱ्याच ठिकाणी पडझड झाली आहे. त्याची मधून मधून डागडुजी केली जाते हे महत्त्वाचे आहे. तरीही तो चांगल्या अवस्थेत राहावा यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

समुद्रात असलेले हे महत्त्वाचे ठिकाण असल्याने ते प्राप्त करण्यासाठी १७६३ मध्ये पोर्तुगीजानी या किल्ल्यावर हल्ला केला. मराठे प्राणपणाने लढले आणि पोर्तुगीजांना परत जायला भाग पाडले. परंतु १७६५ मध्ये इंग्रजांनी तो जिंकला आणि किल्ल्याला फोर्ट ऑगस्टस असे नाव दिले. पुढच्याच वर्षी इंग्रजांशी करार करून मराठ्याने तो परत घेतला. परंतु १८१२ मध्ये करवीरचे छत्रपती आणि इंग्रज यांच्यात करार होऊन तो परत इंग्रजांच्या ताब्यात गेला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तेव्हाच या किल्ल्याची मालकी भारत सरकारकडे आली. महाराष्ट्राच्या भूमीत अनेक गड किल्ले आहेत, त्यामध्ये सिंधुदुर्गचे महत्त्व काही औरच आहे. समुद्रात असलेला हा किल्ला आपला संस्कृतिक वारसा आहे. तो आपण जपला पाहिजे. मालवण शहर जवळ असल्यामुळे या किल्ल्याला भेट देणे मुळीच कठीण नाही. यानिमित्ताने मी वाचकांना असे आवाहन करू इच्छिते की, त्यांनी एकदा तरी या किल्ल्याला भेट देऊन या ऐतिहासिक वास्तूची माहिती मिळवावी.

**– सौ. शोभा आगरकर**
सी १४, वैभव नगरी,
काटई गाव, डोम्बिवली पूर्व
जि. ठाणे – ४२१२०४

•••

(पृष्ठ क्र.५ वरून - **प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे – डॉ. विजय बेडेकर यांचे योगदान)**

अभ्यास संस्थेचे संदर्भ ग्रंथसंग्रहालय व वस्तुसंग्रहालय समृद्ध स्वरूपात उभे करण्यामागे संस्थेचे संस्थापक संचालक डॉ. विजय बेडेकर यांचे मोठे योगदान आणि परिश्रम आहेत. संस्थेला अशा पद्धतीची शैक्षणिक श्रीमंती आणि वैभव प्राप्त करून देण्यासाठी डॉ. विजय बेडेकर यांनी अनेक प्रसंगी पदरमोड केली आहे. डॉ. बेडेकर यांनी जगातील विविध देशांमधून खास ग्रंथसंग्रह स्वखर्चाने आणून संस्थेचे ग्रंथालय समृद्ध केले आहे. प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या सर्वच कार्यक्रमांमध्ये शिस्त आणि वक्तशीरपणा आणि कामकाजातील चोखपणा या सर्वांवरसुद्धा नेहमीच डॉ. बेडेकर यांच्या शिस्तशीर व्यक्तिमत्त्वाची छाप दिसून येते. अलीकडचा कोविडकाळ वगळता गेली अनेक वर्ष संस्थेच्या कार्यक्रमाचे वार्षिक नियोजन पत्र/कॅलेंडर वर्षाच्या सुरुवातीसच प्रकाशित करण्याचा उपक्रम आणि त्यानुसारच कार्यक्रम आयोजनाची शिस्त हेसुद्धा संस्थेचे वैशिष्ट्य आहे.

संस्थेचा विकास म्हणजे पर्यायाने शहराचा व नागरिकांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास ठरतो. ‘स्मार्ट सिटी’ची संकल्पना खऱ्या अर्थाने राबवायची असेल तर केवळ रस्ते, दिवाबत्ती, तरणतलाव, मेट्रो यांपुरते मर्यादित न राहता शहरातील ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये आणि शैक्षणिक संस्था मोठ्या व स्वयंपूर्ण कशा होतील हे पाहण्याची आवश्यकता आहे असे डॉ. विजय बेडेकर यांना वाटते. शहर नियोजनामध्ये या बाबींचा विचार आवश्यक असल्याचे मत डॉ. बेडेकर मांडतात.

**मुलाखत : प्रा. नारायण बारसे**
ग्रंथपाल,
जोशी–बेडेकर महाविद्यालय,
ठाणे


•••

आयुष्यात हजारो माणसे मिळतील पण आपल्या हजारो चुकांना क्षमा करणारे
आई–वडील पुन्हा मिळणार नाहीत.

# श्रीराम : चारित्र्य-मंजिरी

*'श्रीराम : चारित्र्य-मंजिरी' या ग्रंथाचा परिचय या लेखात दिला आहे - संपादक*

रामायणावर अनेक ग्रंथ आहेत, त्यात 'श्रीरामः चारित्र्य-मंजिरी' या उत्कृष्ट ग्रंथाची भर पडली आहे. श्रीराघवेंद्र स्वामींनी फक्त १२ संस्कृत श्लोकांत लिहिलेल्या श्रीरामाच्या चरित्राचा विश्लेषणासहित विस्तृत कन्नड भाष्य व त्याचा प्रा. गुरुनाथ कुलकर्णी यांनी केलेला हा मराठी अनुवाद आहे. प्रा. गुरुनाथ कुलकर्णी यांनी स्वतः बरेच संशोधन करून, त्यात अपरिचित शब्दांचे विवरण, रामायणाशी संबंधित देवता, ऋषिमुनी, राजे यांचा परिचय, त्यांचे नातेसंबंध, तसेच विविध दानव परिवार, रामायणात उल्लेख असलेल्या पर्वत, नद्या, नगरे, राजधान्या यांची थोडक्यात माहिती, श्रीरामाच्या वनवास काळातील प्रवासाचा फार उपयुक्त असा नकाशा, श्रीरामसेतू वगैरे विषयी अत्यंत उपयुक्त अशी माहिती संकलित करून दिली आहे. प्रा. गुरुनाथ कुलकर्णी यांचा अनुवाद इतका सरस आहे की, 'प्रत्यक्षाहुनी प्रतिमा उत्कट' असे म्हणावेसे वाटते, अनुवाद वाटतच नाही, मूळ लेखनच वाटते. असो. रामायणात रुची असलेल्यांनी, श्रीरामाचे चरित्र आणि चारित्र्य जाणू इच्छिणाऱ्यांनी तो जरूर वाचला/अभ्यासला पाहिजे. आपण या ग्रंथाची काही वैशिष्ट्ये या लेखात पाहू या.




## चरित्र व तपशील

श्रीरामाच्या जन्मापासून, शेवटी अयोध्या सोडून लक्षद्वीपाला जाईपर्यंतच्या श्रीरामाच्या संपूर्ण जीवनातील घटना व दुर्घटना, त्यांची पार्श्वभूमी व इतर तपशील या ग्रंथात वाचायला मिळतो. अनेकांच्या मनात उदय पावलेल्या चांगल्या वा दैत्यभावना, त्यांचे परिणाम, अनेक दैत्यांचा, दुष्टांचा संहार अशी सर्व माहिती दिली आहे. राम-रावण युद्ध, भरत-भेट, राम व सीता यांचा वनविहार, लक्ष्मणाचा अंत, श्रीरामांनी शेवटी लावलेली राज्यव्यवस्था यासारख्या अनेक घटनांची वर्णने फार उत्तम आहेत. श्रीरामांनी वेळोवेळी केलेला उपदेश, हनुमंत, ब्रह्मदेव व इतर देवांनी केलेल्या श्रीराम-स्तुतीतून श्रीरामाचे दैवी - वैश्विक व मानवी रूपातील कार्य हा सर्व तपशील या ग्रंथामुळे आपल्याला समजतो. वाल्मीकी रामायणाबरोवर उत्तर रामायणही अंतर्भूत असल्याने श्रीरामाचे पूर्ण चरित्र उलगडत जाते.

## सीतात्याग

सीतात्याग व शंबुक-वध हे श्रीरामाच्या चारित्र्यावरचे डाग आहेत असे काही लोक मानतात. ते तसेच कैकेयी, मंथरा यांचे वागणे, रावणाचे उपद्व्याप अशा अनेक घटनांची पार्श्वभूमी व त्या घटनांचा कार्यकारणभाव फार चांगल्या रीतीने वर्णन केलेला आहे. सीतात्याग व शंबुकवध हे झालेलेच नाहीत असे प्रतिपादन हे राम केशव रानडे यांनी आपल्या 'प्रभू रामचंद्र' या पुस्तकात १८ मुद्दे देऊन स्पष्ट केले आहे. त्यातला मुख्य मुद्दा असा की, मूळ वाल्मीकी रामायणात ते नाहीत, रामराज्याभिषेकानंतर ते समाप्त होते. व ते त्रेता युगात घडले आहे. उत्तर कांड लिहिणारा वाल्मीकी फार नंतरचा (द्वापार युगातला) आहे.

(पृष्ठ क्र.१९ वर)

आई-वडिलांसाठी कोणतीही गोष्ट सोडा. पण, कोणत्याही गोष्टीसाठी आई-वडिलांना सोडू नका.

# तिळगूळ घ्या, गोड बोला

*ज्येष्ठ अभ्यासक श्री. चंद्रशेखर टिळक यांचा अभ्यासपूर्ण लेख - संपादक*

मा. श्री. एन. चन्द्रशेखरन

अध्यक्ष

टाटा समूह

सादर अभिवादन

सगळ्यात पहिल्यांदा, आज आम्हां टिळक पंचांगवाल्यांची मकरसंक्रांत असल्यामुळे तुम्हांला मकरसंक्रांतीच्या मनःपूर्वक शुभेच्छा.

तिळगूळ घ्या आणि गोड बोला !

यावर्षी टाटा समूहाला तिळगूळ घ्या म्हणताना एअर इंडिया टाटा समूहाचा हिस्सा झालेली असेल अशी खात्री होती. कारण याबाबत केंद्र सरकारशी टाटा समूहाच्या झालेल्या करार-मदाराच्या सर्व शर्ती टाटा समूहाने पूर्ण केल्या आहेत. मात्र त्याच करारानुसार केंद्र सरकारने एअर - इंडियाचा ताबा टाटा समूहाला ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत देणे अपेक्षित होते. पण ते मात्र अजून झालेले नाही. तेही कार्यक्षम पंतप्रधान, कार्यक्षम अर्थमंत्री, कार्यक्षम केंद्रीय सचिव असताना !

आणि अशी दिरंगाई एअर इंडियाच्या विक्रीसारख्या विक्रमी आणि महत्त्वाकांक्षी निर्णयाबाबत!

त्यामुळे सहजच मनात आले की, हेच जर एअर-इंडियाचा ताबा दुसऱ्या एखाद्या उद्योगसमूहाला द्यायचा असता तर अशी दिरंगाई झाली असती का ?

तसेही एअर - इंडियाचा इतिहास किंवा सर्वसाधारणपणे आपल्या देशाचा स्वातंत्र्योत्तर आर्थिक इतिहास पाहिला तर निःसंशय - निर्विवाद पारदर्शक अशा स्वतःच्या तत्त्वांवर चालणारा टाटा समूह कोणत्याच केंद्र सरकारच्या अपेक्षित यादीत नसतो

आणि तरीही, की म्हणूनच, सर्वसामान्य भारतीयांच्या मनातील विश्वासार्हतेची यादी टाटा समूहाशिवाय सुरूच होत नाही. यापुढेही होणार नाही.

त्यामुळे एका वेगळ्याच अर्थाने टाटा समूह सध्या केंद्र सरकारला तिळगूळ घ्या, गोड बोला म्हणत असणार का !

सर, आज हे असे वाटण्याचे कारण आणि आपली कोणत्याच अर्थाने कोणतीही ओळख नसताना असे पत्र लिहिण्याचा उद्धटपणा करण्याचे कारण म्हणजे तुम्ही तुमच्या टाटा समूहातील सर्व सहकारी कर्मचाऱ्यांना उद्देशून लिहिलेले एकपानी छोटेखानी पत्र.

आणि त्या पत्रात असणारा एअर-इंडियाचा उल्लेख.

एअर - इंडिया थोड्याच दिवसांत टाटा समूहाचा हिस्सा बनणार हे आता निर्विवाद !

त्यामुळे ते एक महत्त्वपूर्ण आणि यशस्वी पाऊल आहे असा तुम्ही तुमच्या सहकारी कर्मचाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या २०२२ चे स्वागत - शुभेच्छा पर उपरोक्त पत्रात केलेला उल्लेख यथार्थच आहे.

मात्र आजमितीला तरी एअर-इंडियाचा ताबा टाटा समूहाकडे नसणे हा तिळगूळ न वाटता तिळगुळाबरोबर दिल्या जाणाऱ्या काटेरी हलव्या सारखा वाटतो!

अर्थातच हलवा लक्षात राहात नाही.

लक्षात राहतो तो तिळगूळ ... या प्रकरणात एअर - इंडिया टाटा समूहात !

याबाबत टाटा समूहाचे सर्वसामान्य भारतीय नागरिकांच्या मनातले अभिनंदन आणि आनंद कळवण्यासाठी हे पत्र.

सर, तिळगूळ घ्या आणि गोड बोला!

सर, अगदी खरं सांगू ?

या तिळगुळाबरोबर अजून एक प्रकारचा काटेरी हलवा आहे ...निदान आमच्या मनात !

सध्याचा कोरोनाचा काळ, गेल्या पावणे- दोन वर्षांत देशांतर्गत, तसेच विदेशी विमानसेवा कंपन्यांची झालेली परिस्थिती बघता एअर - इंडियाचा ताबा टाटा समूहाला मिळण्यात होत असलेली दिरंगाई ही टाटा समूहासाठी इष्टापत्ती की आपत्ती ?

विस्तारा आणि एअर - आशिया या टाटा समूहाच्या विमानसेवा आम्हां भारतीयांना परिचित आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील आमच्या कल्पना - संकल्पना सकारात्मकरित्या बदलत आहेत. त्यातच एअर - इंडिया टाटा समूहाकडे परत येण्यात 'अजब न्याय वर्तुळाचा' हा सकारात्मक संकल्पनात्मक बदल सुखावत आहे.

अशावेळी ही दिरंगाई....

त्यात जेट एअरवेजचे पुनरागमन..

त्याशिवाय राकेश झूनझूनवाला - विनय दुबे यांची अवघ्या काही महिन्यात सुरू होणारी आकाश एअरवेज...

अशावेळी ही दिरंगाई...

त्यातच गेल्या वर्षी जगप्रसिद्ध गुंतवणूकदार वॉरेन बफे त्यांच्या बर्कशायर हाथवे या कंपनीचे निकाल जाहीर करताना म्हणले होते की, ती विमानकंपनी विकत घेतली ही चूक मोठी नव्हती; त्यापेक्षा त्यांनी ती कंपनी ज्या भावाने विकत घेतली ती मोठी चूक होती.

अशात ही दिरंगाई....

सर, तिळगूळ घ्या, गोड बोला .... !

सर, तुमच्या उपरोक्त पत्रात तुम्ही २०२४ पर्यंत आपली राष्ट्रीय अर्थव्यवस्था ३ ट्रिलियन डॉलर्सची होण्यात टाटा समूह पूर्ण ताकदीने सहभागी होईल याची खात्री दिली आहेत.

सर, टाटा समूहानी उच्चारलेल्या प्रत्येक शब्दावर आम्हां भारतीयांचा पूर्ण विश्वास आहे...

आमचा आमच्या स्वतःच्या शब्दांवर-भावनांवर-स्वप्नांवरही इतका विश्वास नसतो!

कारण टाटा समूह सगळ्यात जास्त ते सत्यात आणतात.

टाटा समूहाबाबतच्या आमच्या भावना म्हणजे श्री गजानन विजय ग्रंथाच्या (गजानन महाराज पोथी) ५ व्या अध्यायातील १३४ व्या ओवीत म्हटले आहे तसे-

'भगवंताचे देवपण
कृतीनेच कळले की,'
अशा आहेत...
म्हणून हे सगळे आठवले इतकेच!

सर, हे म्हणणे स्वप्नील किंवा भाबडेपणाचे नाही; तर टाटा समूहाने आजपर्यंत दाखवलेल्या भविष्यवेधी भूतकालाचे आणि भविष्यकालाचे आहे. कारण कविवर्य विंदा करंदीकर जसे त्यांच्या एका कवितेत म्हणतात.,.

इतिहासाचे अवघड ओझे
डोक्यावर घेऊन नाचा
करा पदस्थल त्याचे आणिक
त्यावर चढूनी भविष्य वाचा

असाच टाटा समूह आहे.... त्याच्या आजपर्यंतच्या इतिहासात.

---

आईसारखा चांगला टीकाकार कोणी नाही आणि तिच्यासारखा खंबीर पाठीराखा कोणी नाही.

त्यातून माझ्या आधीच्या आणि माझ्या पिढीचे भूत, वर्तमान आणि भविष्य घडले आहे आणि आमच्या पुढच्या पिढ्यांचेही घडणार आहे.

या सार्थकतेसाठी, सादर अभिवादन करण्यासाठी हे टाटा समूहाला पत्र....

सर, तिळगूळ घ्या, गोड बोला

सर, आज हे पत्र लिहून तुम्हांला तिळगूळ घ्या, गोड बोला लिहिण्याचे अजून एक कारण म्हणजे, विशेषतः २०२२ मधे आणि एकंदरीत येणाऱ्या काळात टाटा समूह काय धोरणाने वागणार याचे तुम्ही केलेले सूतोवाच...

खरं म्हणजे याची सुरवात टाटा समूहाने आधीच केली आहे. Digital, New Energy, Supply Chain Management, Health या क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्याचा उल्लेख उपरोक्त पत्रात आहे. हा उल्लेख वाचत असताना माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी मार्च २०२० मधे केलेल्या 'आत्मनिर्भर भारत' संबोधनाची आठवण आली. आता जेंव्हा टाटा समूह त्याच्या आजपर्यंतच्या समृद्ध इतिहासाच्या पार्श्वभूमीवर असा पुनरुच्चार करतो तेंव्हा जेथल्या तिथे असू द्यावे (श्री गजानन विजय, अध्याय ५, ओवी ६७) असे म्हणावेसे वाटते.

सर, सध्याच्या विपरीत व अनिश्चित परिस्थितीत तुमचे उपरोक्त पत्र केवळ टाटा समूहातील कर्मचारी सहकाऱ्यांचेच नव्हे; तर आम्हां सर्वच भारतीय नागरिकांचे मनोबल वाढवेल हे निःसंशय !

अशाही अर्थाने, तिळगूळ घ्या, गोड बोला !

सर, तुम्ही तुमच्या उपरोक्त पत्रात केवळ घोषवाक्य देऊन थांबला नाहीत. तर ते प्रत्यक्षात आणण्यासाठीची अनुभवसिद्ध कार्यक्रम-पत्रिकाही दिली आहे. गेले एक-दीड वर्ष संपूर्ण टाटा समूह अंमलात आणत असलेली ३ड कार्यपद्धती ही ती कार्यक्रम पत्रिका ... ..... Simpler, Stronger and Sustainable म्हणजे ३ड. त्यामुळे हे पत्र वाचत असताना पटकन मनात आले की, ही त्रिसूत्री आम्हां सगळ्यांच्याचसाठी उपयुक्त आहे. खरं म्हणजे, हे पत्र म्हणजे तुम्ही सगळ्यांना दिलेला सक्रिय, अनुभवसिद्ध तिळगूळ आहे. कारण आम्हां सर्वसामान्य माणसांची सद्यस्थिती ही पूर्णपणे भांबावून गेलेली आहे. अगदी -

तुझ्यासारखे निरुद्योगी
जन्मले आमच्यात जागोजागी
म्हणून झालो अभागी
आम्ही चहू खंडांत

(श्री गजानन विजय ....अध्याय ५, ओवी १०६) अशी स्थिती.

आणि म्हणूनही सर, तिळगूळ घ्या, गोड बोला ..... !

सर, म्हणून हे तुम्हांला खुले पत्र...

एक नागरिक म्हणून तुमचे हे पत्र ही आमची विचारसंहिता

आणि

एक सर्वसामान्य वैयक्तिक गुंतवणूकदार म्हणून सुमारे ३० नोंदणीकृत टाटा कंपन्यांचे शेअर्स यथाशक्ती नियमितपणे विकत घेत राहणे ही आमची आचारसंहिता.

व्यक्तिशः तुम्हांला आणि एकंदरीतच टाटा समूहाला तिळगूळ घ्या, गोड बोला म्हणण्याची आमची ही पद्धत तुम्हांला चालेल ना ?

सर, पत्रात लिहून तर गेलो की, टाटा समूहाच्या नोंदणीकृत कंपन्यांचे शेअर्स नियमितपणे यथाशक्ती घेत जाईन म्हणून ! पण मग असे वाटले की तुम्हालाच एक विनंती करावी....

ही विनंती म्हणजे दर वर्षी वर्षाच्या सुरवातीला तुम्ही टाटा समूहाचे प्रमुख म्हणून तुमच्या सर्व सहकारी कर्मचाऱ्यांना उद्देशून जसे पत्र लिहिता ना, तसे टाटा समूहातील सर्व कंपन्यांच्या सर्व भागधारकांना उद्देशूनही एक पत्र लिहीत जा ना....

असे मनात येण्याची दोन कारणे.....

पहिले कारण म्हणजे, टाटा समूहाच्या सर्वच कंपन्यांमधे या ना त्या स्वरूपात, या ना त्या प्रमाणात टाटा sons ची गुंतवणूक असते. त्यामुळे संबंधित कंपनीच्या वार्षिक अहवालात आणि प्रसंगोत्पात वार्तापत्रात मिळणाऱ्या माहिती व्यतिरिक्त तुमचे असे पत्र आम्हां टाटा कंपन्यांच्या समभागधारकांना (शेअर-होल्डर्स) नक्कीच उपयोगी होईल.

अतिशय पारदर्शक आणि विश्वासार्ह व्यवहारांची सातत्यपूर्ण परंपरा असणाऱ्या टाटा समूहाकडून अशी अपेक्षा धरू शकतो.

आणि टाटा समूहातील सर्व नोंदणीकृत कंपन्यांच्या सर्व समभागधारकांना असे एक सर्वसमावेशक पत्र दरवर्षी तुम्ही लिहिण्याची प्रथा सुरू व्हावी असे वाटण्याचे दुसरे कारण म्हणजे, गेली कित्येक वर्षे अशा पद्धतीची पत्रे जगप्रसिद्ध गुंतवणूकदार बर्कशायर हाथवेचे सर्वेसर्वा वॉरेन बफे त्यांच्या संस्थेच्या गुंतवणूकदार- भागधारकांना नाही का लिहीत ! त्यांची ही पत्रे आणि त्या पत्रांची आधी आतुरतेने वाट आणि नंतर निरंतर अभ्यास हा जागतिक गुंतवणूक क्षेत्राचा ठेवा आहे.

सर, टाटा समूहाच्या प्रमुखांनी त्यांच्या समभागधारकांना लिहिलेले असे पत्र हे त्याच्या पुढचे पाऊल ठरेल.

बर्कशायर हाथवेला मागे टाकेल, निदान समर्थ टक्कर देईल अशी बौद्धिक-भावनिक-सामाजिक-आर्थिक आणि संवेदनाशील ताकद, समज, दानत आणि ऐपत आपल्या देशात आजमितीस तरी फक्त आयुर्विमा महामंडळ आणि टाटा समूह या दोघांच्यातच आहे. सध्याच्या काळात स्वदेशी आणि विदेशी गुंतवणुकीचे आकर्षण- बिंदू म्हणून आपल्या देशाचे गुंतवणूक क्षेत्र पुढे येत असताना हे फार फार उपयोगी ठरेल.

सर, तिळगूळ घ्या, गोड बोला ...

गजानन महाराजांच्या पोथीत 'जग, जन आणि जनार्दन' असे लिहिले आहे.

सर, तुमचे हे पत्र वाचताना त्याची आठवण झाली.

आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात सहकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबीयांसमवेत वेळ घालवावा (तोही Quality Time) असे आवर्जून लिहिणाऱ्या, सध्याच्या विपरीत परिस्थितीतून बाहेर येण्यात कुटुंबीयांनी केलेल्या सहकार्याचा मुद्दामहून उल्लेख करणाऱ्या तुम्हाला, तुमच्या कुटुंबीयांना आणि सर्व टाटा समूहाला मकरसंक्रातीच्या शुभेच्छा !

सर, राजकारणात अटलजी-शास्त्रीजी, क्रिकेट मधे राहुल द्रविड आणि अर्थकारणात टाटा समूह ही अशी मोजकी उदाहरणे आहेत की पक्क्या व्यावसायिक क्षेत्रात सुद्धा सचोटीने-संस्कारांनी वागूनही चिरकालीन यश मिळवता येते हे स्वयंप्रकाशी- स्वयंभू उदाहरणाने दाखवून देतात. सध्याच्या वातावरणात त्याची खूप गरज आहे. त्यामुळे या संक्रमणाच्या काळात तुमचे हे पत्र वेगळ्या अर्थाने तिळगूळ घ्या, गोड बोला .....

सर, तिळगूळ घ्या, गोड बोला.

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

# चित्रपट-कर्त्याने केवळ नव-निर्मितीच करायला हवी का?
## - सत्यजित राय

*२ मे २०२१ ही सत्यजित राय यांची जन्मशताब्दी. सत्यजित राय ह्यांनी भारताचे नाव जागतिक कलात्मक चित्रपटांच्या दुनियेत कायमचे नोंदवले. त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने २ मे २०२० पासूनच जगभर कार्यक्रम सुरू झाले आणि आजही होत आहेत. शंकरराव ब्रह्मे समाज विज्ञान ग्रंथालय पुणे यांच्या या माध्यमातून सत्यजित राय यांच्यावरील चित्रपट महोत्सव नुकताच आयोजित करण्यात आला होता. सत्यजित राय यांच्यावरील प्रस्तुत लेख शंकरराव ब्रह्मे समाज विज्ञान ग्रंथालय पुणे यांनी अनुवादित केला आहे - संपादक*

सर्व महान चित्रपट-कर्त्यांनी इतरांच्या कथांमधून अभिजात चित्रपट बनवले आहेत.

अशा प्रकार *अपूर संसार*नेही स्वतः लेखकाने कल्पिलेल्या या घटनांमधूनच आकार घेतला. चित्रपट माध्यमाचा दुभाष्या या नात्याने निवड करण्याचा, बदल करण्याचा, पुनर्रचना करण्याचा हक्क बजावला जातो इतकेच.

व्यावसायिक काम करण्याच्या हेतूपलीकडे जाऊन, कलात्मक निर्मितीचे ध्येय ठेवणाऱ्या प्रत्येक चित्रपट-कर्त्याला तो हक्क पोहोचतो. यासाठी लागणारे साहित्य तो जरूर उधार घेऊ शकतो, परंतु त्याने त्या सामग्रीत स्वत:च्या माध्यमाच्या असलेल्या अनुभवांची जोड देऊन रंग भरायला हवा. तसे केले तर आणि तरच पूर्ण झालेला चित्रपट हा त्याचा स्वतःचा बनतो. ज्या अर्थाने शाकुंतल हे स्वतः कालिदासाचे असते, व्यासांचे नव्हे.

हे एक उघड सत्य आहे की, बरेच चित्रपट उपलब्ध असलेल्या कथांवर आधारित असतात. यात कमीपणा वाटण्याजोगे काही नाही. खरेतर, याचे दोन उघड आणि प्रशंसनीय पैलू आहेत : कथांच्या लेखकांना अतिरिक्त (आणि बहुतेक अनपेक्षित) उत्पन्नाचा स्रोत लाभतो; आणि चित्रपट-कर्त्याला सुरुवात करण्यासाठी तयार अशी बैठक लाभते.

**प्रामाणिक कलाकार या नात्याने दिग्दर्शकाने दुसऱ्याच्या कल्पना वापरू नयेत का?**

असे काही नाही, खरोखरच नाही. याबाबत याला खूप चांगली साथ आहे. शेक्सपियर आणि कालिदास यांनी साहित्यात हेच केले आहे. बरेच उत्कृष्ट ऑपेरा आणि बॅले विद्यमान कल्पनांवरच आधारलले होते. याला चॅप्लिन कदाचित अपवाद मानता येईल. याला स्वतःच्या अनोख्या शेक्सपिरियन व्यक्तित्वाभोवतीच कथा रचणे भाग पडत असे. पण यानेदेखील एकदा मोसेय वेर्दूमध्ये दुसऱ्यांची कल्पना वापरली आहे. चॅप्लिनचा अपवाद सोडता सर्व महान चित्रपट-कर्त्यांनी इतरांच्या कथांचा उपयोग करून अभिजात चित्रपट बनवले आहेत.

यावर एक प्रश्न विचारला जाऊ शकतो: जर या चित्रपट-कर्त्यांचे मूळ कथा किंवा कल्पनेत योगदान नसेल तर त्यांचे नक्की योगदान असते तरी काय?

तसे पाहायला गेले तर असेही विचारता येईल की, शाकुंतलामध्ये कालिदासाचे नेमके योगदान काय? किंवा हॅम्लेटमध्ये शेक्सपियरचे तरी योगदान काय? किंवा वैष्णव कवींचे योगदान काय? यांनी तर एकाच मूलभूत विषयवस्तूवर म्हणजे कृष्ण आणि राधा यांच्या प्रेमावर काव्ये केली.

ॲना कॅरेनिना या कथावस्तूतले फक्त मूलभूत सूत्र घेतले तर आपल्या हाती काय लागते? हजारो सवंग कादंबरीकांचे सर्वसामान्य कथासूत्र.

वडील म्हणजे समुद्रातलं जहाज असतं, पाण्यात न भिजवता किनाऱ्याला नेत असतं.

आणि तरीही ॲना कॅरेनिना उत्कृष्ट कलाकृती बनते ती कशामुळे?

या प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी आपण थोडेसे मागे जाऊ या आणि चित्रपट-कर्ता जेव्हा कथेची निवड करतो तेव्हा तो कोणती मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेतो ते पाहू या. जर चित्रपट-कर्त्याला प्रामुख्याने पैसे कमवायचे असतील (जे पूर्णपणे रास्त आहे), तर तो कदाचित एखाद्या सर्वाधिक लोकप्रियता आणि खप असलेल्या कादंबरीची निवड करेल. चित्रपट बनवताना मूळ कादंबरीशी शब्दशः एकनिष्ठ राहणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट असेल. कारण प्रेक्षकांना ही कथा माहीत आहे, प्रिय आहे आणि तिच्या कथासूत्रापासून ढळल्यास ते अजिबात खपवून घेणार नाहीत. म्हणूनच चित्रपट-कर्ता चित्रपटाला 'किती सुंदर! अगदी पुस्तकात आहे तसेच!' अशी सर्वोच्च प्रतिक्रिया मिळवण्याच्या दृष्टीने आपली सर्व शक्ती पणाला लावेल.

परंतु कथेशी अशी गुलामी पत्करून केलेल्या रूपांतरांमधील फारच थोडे चित्रपट वाखाणण्याजोगे बनले आहेत. एरवी प्रेक्षक अशा चित्रपटांना किती आणि कशी मान्यता देतात त्यावरून कथेचे चित्रपटाच्या माध्यमांमध्ये खरेखुरे रूपांतर करण्यामागील हेतू व आवाका यांबाबतचे त्यांचे अजाणतेपण किती आहे ते कळते.

पुस्तकावर आधारलेल्या एखाद्या चांगल्या चित्रपटाची त्याच्या मूळ पुस्तकाशी तुलना केलीत तर तुम्हाला असे आढळेल की, मूळ पुस्तकाच्या संपूर्ण पुनर्मांडणीची प्रक्रिया होऊन त्याचा कायापालट झालेला आहे. याचे कारण सोपे आहे, आणि त्याचे महत्त्व सांगावे तितके थोडेच आहे: पुस्तके मूलत: चित्रीकरणासाठी लिहिली गेलेली नसतात.

जर तसे असते तर पुस्तके ही पटकथांसारखी लिहिली गेली असती. आणि जर ती पटकथा म्हणून चांगली लिहिलेली असती तर साहित्य या नात्याने ती वाचनीय झाली नसती. कारण शेवटी पटकथा म्हणजे काय असते? जे खरोखर दृश्यांच्या माध्यमातून पोहोचवायचे आहे त्याकडे फक्त निर्देश करणारा मजकूर तेवढा त्यात असतो.

जेव्हा मी 'पुनर्मांडणी' म्हणतो तेव्हा मला अभिप्रेत असलेला अर्थ कथावस्तूची पूर्वीची ओळख पुसून टाकणे असा होत नाही. अर्थातच त्या साहित्यकृतीतील अनेक गोष्टींमध्ये बदल होत नाही किंवा बदल झाला तरी त्या सहज ओळखू येतात आणि बहुधा याच गोष्टींमुळे चित्रपटकर्ता त्या साहित्य कृतीकडे आकर्षित झालेला असतो. मग ती काही पात्रे असतील किंवा नाती असतील किंवा एखादा ताकदीचा प्रसंग असेल किंवा एखादी कल्पना असेल - संपूर्ण कलाकृती किंवा तिचा काही भाग व्यापणारी, उमदी किंवा खूप हुशारीने वापरलेली किंवा विचार करायला भाग पाडणारी कल्पना - किंवा नुसती एखादी आकर्षक ओळ किंवा कलाटणी असेल.

मी दोन सुप्रसिद्ध बंगाली कादंबऱ्यांवर आधारित एक चित्रत्रयी बनविली आहे. या चित्रत्रयीतील पहिला चित्रपट आहे *'पथेर पांचाली'* जो त्याच नावाच्या पुस्तकावर आधारित आहे. ते एक महान पुस्तक आहे आणि बंगाली साहित्यातील एक अभिजात साहित्यकृती. तिच्यात चित्रपटात रूपांतर करण्याजोगे अनेक तरल, चित्रमय तसेच भावनिक गुण आहेत. चित्रपटात हे गुण टिकवून ठेवण्याचा मी प्रयत्न केला आहे.

दुसरा चित्रपट आहे *'अपराजितो.'* यात चित्रत्रयीचे मध्यवर्ती पात्र अपू वयात येण्याचा काळ दाखवला आहे. हा चित्रपट 'पथेर पांचाली' या पुस्तकाच्या शेवटच्या भागावर आणि 'अपराजितो' याच नावाच्या दुसऱ्या कादंबरीच्या पहिल्या भागावर आधारित आहे.

कादंबरी म्हणून 'अपराजितो' ही 'पथेर पांचाली'च्या

---

वडील आणि मुलगा यांच्यामधल्या वाढत जाणाऱ्या 'जनरेशन गॅप' नावाच्या दरीला जोडण्यासाठी 'आई' नावाचा भक्कम पुल असतो.

तुलनेत खूपच कमी उंचीची आहे असे म्हणता येईल. ती नको तितकी मोठी, पसरट आणि विखुरलेली आहे. त्यात नको तेवढ्या व्यक्तिरेखा आहेत आणि बऱ्याचदा ती एका वरवरच्या नैसर्गिकतेत अडकून राहते. परंतु तिच्या पहिल्या अर्ध्या भागात निदान एक उल्लेखनीय पैलू आहे – विधवा आई आणि तिच्यापासून लांब जात चाललेला मुलगा यांच्या नात्यातील गहन सत्य. अपराजितोच्या पटकथेचे, किंबहुना चित्रपटाचेच अस्तित्व या विशिष्ट हृदयाला भिडणाऱ्या संघर्षावर टिकून आहे.

'अपूर संसार' हा या चित्रत्रयीतील तिसरा चित्रपट, तो 'अपराजितो' या कादंबरीच्या उत्तरार्धावर आधारित आहे. त्याने मात्र माझ्यासमोर अनेक समस्या उभ्या केल्या. अनाथ अपू आता तरुण झाला आहे आणि लेखक बिभूती भूषण बनर्जी यांनी चितारलेल्या त्याच्या व्यक्तित्वाला भावनिक दृष्ट्या तेवढीशी संगती नाही.

कादंबरीत अपूचा एका मुलीवर जीव जडलेला आहे; परंतु दुसऱ्याच मुलीशी लग्न करणे त्याला भाग पडले आहे. लेखक ही दोन नाती एकत्र विणण्याचा प्रयत्नदेखील करत नाही. यामुळे अपेक्षित असलेले भावनिक संकट वा उलथापालथ उभीच राहत नाही. बाळंतपणात पत्नीचा मृत्यू होतो. अपू आपल्या बाळाची विचारपूसदेखील करत नाही. मुलाचा त्याग करतो, शहर देखील सोडतो. काही वर्षांने त्याला मुलाला पाहण्याची तीव्र इच्छा होते. चुटपुटत्या भेटीनंतर अपू पुन्हा एकदा मुलाला सोडून जातो. काही वर्षांनी तो आपल्या मुलाला भेटायला येतो, अचानक वाटू लागलेल्या अपत्यप्रेमाने भारावून जातो आणि मुलाबरोबर शहरातच स्थायिक होण्याचा निर्णय घेतो. शेवटी तो आपल्या ८ वर्षांच्या मुलाला पुन्हा सोडून जातो. त्याचा सांभाळ करण्यासाठी मित्रांच्या ताब्यात देऊन कसल्यातरी गूढ शांतीच्या शोधात अज्ञात प्रदेशात निघून जातो.

अर्थात माझ्या सारांशामध्ये या घटनांचा परस्परसंबंध जेवढा विचित्र वाटतो तेवढा पुस्तकातील चारशे पानांच्या निवांतपणे सरकत जाणाऱ्या मजकुरामध्ये वाटत नाही.

या साऱ्यातून चित्रपट बनवताना मी प्रामुख्याने फक्त दोन पैलूंवर लक्ष केंद्रित केले. पहिला पैलू म्हणजे संघर्षशील बुद्धिजीवी अपू आणि अपर्णा यांचे नाते. अपर्णा – त्याच्या आयुष्यात अकल्पितपणे आलेली साधी सरळ पत्नी, श्रीमंतीत वाढलेली असूनही नवऱ्याच्या प्रेमापोटी गरिबीशी जुळवून घेऊन संसार करायची तयारी असलेली.

दुसरा पैलू आणखीनच भावणारा होता, अपर्णाचा बाळंतपणात मृत्यू होतो. सर्वसाधारण संकेत पाळणाऱ्या पारंपरिक लेखकाने वाचलेल्या मुलाच्या पाळण्याकडे धाव घेणाऱ्या वडिलांचे चित्र उभे केले असते. अनेकदा पृष्ठभागावर दिसणाऱ्या गोष्टींमध्ये समाधान न मानता अधिक खोलात जाऊन सत्याचा शोध घेणारे बिभूती भूषण अपूला मुलाच्या विरोधात वळवतात – तो आपल्या पत्नीच्या मरणाचे कारण झालेल्या मुलाचा तिरस्कार करू लागतो.

वडील आणि मुलाची पहिली भेट बऱ्याच वर्षांनंतर होते. पटकथाकाराच्या दृष्टीने भावना व्यक्त करण्याची संधी देणारा याच्यापेक्षा आणखी कोणता हृद्य क्षण असू शकला असता?

संदर्भ : संदीप राय यांनी संपादित केलेल्या ''सत्यजित राय ऑन सिनेमा'' या २०११ साली कोलंबिया युनिव्हर्सिटी प्रेस, न्यू यॉर्क यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकातील अंश. अनुवाद आमचा.

**– शंकरराव ब्रह्मे**
समाज विज्ञान ग्रंथालय,
पुणे

●●●

आईच्या ममतेचा आणि बापाच्या क्षमतेचा अंदाज कधीच लागत नाही..

# वेळणेश्वर भेट

## (भाग पहिला)

## वेळणेश्वरची अभियांत्रिकी

*विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालयाने वेळणेश्वर येथील विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयास व वेळणेश्वर परिसरास भेट दिली. त्या भेटीचा अनुभव या लेखात कथन केला आहे- संपादक*

वेळणेश्वर हे रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर या तालुक्यातील ४००० वस्तीची ग्रामपंचायत आहे. चिपळूणपासून तास-दीड तासाच्या अंतरावर हे स्थान आहे. मुंबईपासून कोकणाकडे जाणारी प्रत्येक रेल्वे चिपळूण रेल्वे स्थानकात थांबून जाते आणि म्हणून प्रवास तसा अवघड नाही. कोकणाचे नैसर्गिक सौंदर्य रेल्वेतूनही बघता येऊ शकते. चिपळूण ते वेळणेश्वर हा प्रवासही निसर्गाच्या अनेक किमया दाखवत पुढे पुढे जात असतो. तुम्ही कदाचित विचार करत असाल की, आज वेळणेश्वर विषयी बोलण्याचे काय कारण असेल? कारण म्हणजे, विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालयाने वेळणेश्वर येथील विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयास व वेळणेश्वर परिसरास भेट दिली आणि तीन दिवसांच्या मुक्कामात अनुभवाला आलेले प्रसंग आणि विचार आपल्यासमोर मांडावे असा विचार आला आणि म्हणूनच हा प्रयत्न.



विद्या प्रसारक मंडळाने काही वर्षांपूर्वी वेळणेश्वर इथे ३५ एकर अशा एवढ्या मोठ्या परिसरात अत्याधुनिक यंत्र-तंत्रगत असे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले. या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या काही विशेष बाबी इथे सांगणे अगदी महत्वाचे आहे. हे अभियांत्रिकी महाविद्यालय चिपळूण-रत्नागिरी या मार्गाला लागून आहे. अगदी दुरूनच भव्य अशा मोठ्या इमारतीचे दृश्य दिसते आणि या छोट्याशा गावात एवढी मोठी इमारत नेमकी कशाची असेल असा पहिला प्रश्न निर्माण होऊन व्यक्ती मेन गेटच्या जवळ येतो आणि थोडासा आश्चर्यचकित होतो की, ही भव्य इमारत अभियांत्रिकी महाविद्यालयाची आहे. खूप मोठे असे मेन गेट आणि तिथे असलेली सुरक्षा व्यवस्था तुम्हला येथील सुरक्षित वातावरणात आणखी सुरक्षितेची भावना निर्माण करते. आत प्रवेश केल्यानंतर 'अपरांत' नावाची एक इमारत दिसते. दोन मजली ही इमारत सर्व सोयीयुक्त अशा ११ खोल्यांची गेस्ट हाऊस आहे. इथेच आमचाही मुक्काम होता. 'अपरांत' हे कोकणाचे प्राचीन नाव आहे. पश्चिमेकडील प्रदेश म्हणून यास अपरांत म्हटले गेले होते. अपरांतला लागून नाना फडणवीस यांच्या नावाचे ३०० आसनव्यवस्था असलेले सभागृह आहे. वातानुकूलित असे हे सभागृह मुंबई-पुणे येथील अनेक महाविद्यालयातही नसेल असेच आहे. याच इमारतीमध्ये पाहुण्यांसाठी राहण्याची उत्तम सोय करण्यात आलेली आहे. या इमारतीच्या खालच्या मजल्यावर भव्य असे कँटीन आहे. थोडक्यात, वेळणेश्वर येथील लोकसंख्या विचारात घेता एखाद्या मंगलकार्यालयात जेवढी जागा असेल त्यापेक्षा पाच पटीने अधिक जागा आणि मोठे कँटीन विद्या प्रसारक मंडळाने अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी दिले आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक

यांच्यासाठी सर्व सोयीयुक्त अशा वसतीगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्याच्या प्रत्येक रूममध्ये स्वतंत्र पलंग, एक कपाट आणि २४ तास वापरू शकाल अशा WiFi ची व्यवस्था तुम्हाला इथे बघायला मिळेल. इतर कोणत्याही नावाजलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अशी व्यवस्था असल्यास कृपया कळवावे. या महाविद्यालयाचा अजून एक भाग खरंच बघण्यासारखा आहे. तो म्हणजे यांच्या शैक्षणिक इमारती. आधुनिक वास्तुकलेचा एक प्रयोग म्हणून देखील याकडे बघता येऊ शकेल. दोन एकर आणि दहा गुंठे किंवा नव्वद हजार स्केअर फूट एवढा भाग असलेल्या दोन भव्य अशा शैक्षणिक इमारती. या इमारतींना बघितल्यास दोन मोठी जहाजे स्वतःच्या पाठीवर खूप ओझे घेऊन समुद्रात प्रवास करत असल्याचा भास तुम्हाला होईल. इमारतीच्या दोन्ही बाजूने एक सारखाच नजारा आहे. ऑर्किटेक्टची कमाल म्हणायला हवी. इमारतीच्या मागे भले मोठे निळे आकाश, समुद्रकिनारी वाहणारी हवा आणि त्या समुद्रात दोन भीमकाय जहाजे असे ते विलक्षण बांधकाम इथे दिसते. अभियांत्रिकी महाविद्यालय असल्यामुळे AICTE च्या निकषाप्रमाणे येथे सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. मोठमोठ्या कार्यशाळा, त्या कार्यशाळेत असलेले अत्याधुनिक यंत्र इथे मोठ्या आनंदाने विद्यार्थ्यांना स्वतःविषयी माहिती देत असावे अशा प्रकारे ठेवण्यात आलेले आहे. संगणक-कक्ष तर एवढे मोठे आणि वातानुकूलित आहे की, मोठमोठ्या इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी कंपन्यांकडे कदाचितच असे संगणक-कक्ष असतील. प्रत्येक प्राध्यापकासाठी विशेष आणि स्वतंत्र केबिन. आलिशान असे प्राचार्य कक्ष, मोठे कार्यालय असे सगळेच या दोन इमारतींमध्ये समाविष्ट आहे. इथले ग्रंथालय देखील सर्व सुविधायुक्त असून, इथल्या विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली सगळी पुस्तके व इतर साहित्य इथे सहजच उपलब्ध होतात. एक विशेष कक्ष इथे निर्माण करण्यात आले आहे जे विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेवर प्रभुत्व निर्माण करायला शिकविते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाचा प्रयत्न इथे दिसून येतो. या दोन इमारतींचा अजून एक महत्त्वाचा भाग म्हणजे, या दोन्ही इमारतींमध्ये ३०० आसन असलेली दोन सभागृहे आहेत. या परिसरात एकूण तीन सभागृहे असून या तिघांची एकूण क्षमता ९०० आसनं एवढी आहे. हा एकूण परिसर टेकडीवर स्थित आहे. त्यामुळे मेन गेट ते वसतिगृह यात ८० फूट एवढी उंची तुम्हाला दिसून येईल. परंतु चालताना कोणत्याही प्रकारचा थकवा तुम्हाला जाणवणार नाही.

दुसरे असे की, या खडकाळ जमिनीवर बाग फुलविण्याची किमया विद्या प्रसारक मंडळाने केल्याचे तुम्हाला दिसेलच. अनेक प्रकारची झाडे, रंगीबेरंगी फुले, वेली, वडाची झाडे, हिरवेगार गवत असे सगळेच तुम्हाला इथे मिळेल. इथे राहणारा विद्यार्थी नक्कीच सुट्टीच्या दिवशी या झाडांच्या सावलीत अभ्यास करत असेल, काय मज्जा येत असेल! झाडाखालचा अभ्यास मुंबई-ठाण्याच्या विद्यार्थ्यांच्या नशिबात कुठे? या परिसरात मोर देखील बघायला मिळतात. आमच्या तीन दिवसांच्या मुक्कामात विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सरांच्या सोबत अनेक विषयांवर चर्चा करण्याची संधी मिळाली. सरांचे ज्ञान अफाट आहे यात काही शंका नाही, त्याचा लाभ यावेळेस मिळाला. कधीतरी नंतर त्याविषयी लिहीन. परंतु या चर्चा ज्या नाना फडणवीस सभागृहाच्या बाहेर रात्रीचे जेवण करून, आम्ही करत होतो, त्या ठिकाणी वाहणारी थंडगार हवा तुम्हाला आरोग्यदायी बनवते. असले लोकेशन तुम्हाला प्रसिद्ध अशा प्रेक्षणीय स्थळीही सापडणार नाही.

या परिसराची दोन वैशिष्ट्ये सांगणे क्रमप्राप्त आहे. पहिले म्हणजे इथली जल-व्यवस्था आणि दुसरी येथील वीज-व्यवस्था. अभियांत्रिकी महाविद्यालय शोभेल अशी इथली जल आणि वीज व्यवस्था आहे. मेन गेट पासून जवळपास ८०-९० फूट एवढ्या उंचीच्या जमिनीवर एक मोठी पाण्याची टाकी बांधली आहे. ही टाकी पूर्ण

ज्याला आई-बापाच्या कष्टाची जाणीव असते ना, तो कधीच वाईट मार्गाला जात नाही.

परिसराला २४ तास पाणी पुरवठा करते. वापरलेले पाणी पुन्हा शुद्ध करून ते वापरण्याचे कौशल्य इथे निर्माण केले गेलेले आहे. ४००० वस्तीची ग्रामपंचायत असल्यामुळे २४ तास वीज पुरवठा अपेक्षित धरणे जरा अवघड होऊ शकते हा विचार समोर ठेऊन इथे विद्युत केंद्र निर्माण केले गेले आहे, जे इथे कधीच अंधार होऊ देत नाही. सोलर एनर्जीचा वापर करून गरम पाण्याची व्यवस्था इथे निर्माण करण्यात आलेली आहे. परिसरातील रात्रीचे दृश्यही खूप आकर्षक आहे. जागोजागी वीजेचे दिवे आहेत. अभियांत्रिकी महाविद्यालयातील अनेक मुले-मुली रात्रीचे जेवण घेऊन इथे शतपावली करताना दिसले. खानावळ आहेच, जेवणही उत्कृष्ट दर्जाचे आहे. मेन गेट जवळ आपणास एक सुपर मार्केट सारखे म्हणू या हवे तर अशी व्यवस्था करण्यात आली आहे, जिथे विद्यार्थ्यांना हवी असलेली प्रत्येक वस्तू मिळते. एकूणच काय तर, निसर्गाच्या कुशीत राहून अभियांत्रिकी ज्ञान वाढते, अभ्यास करण्यासाठी शांत आणि ज्ञानवर्धक अशी सर्व सोयीसुविधांयुक्त जागा मिळते आणि विशेष म्हणजे आरोग्य लाभते. इथे अनेक कंपन्या प्लेसमेंट करतात, अनेक विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षाला इथे चांगल्या पगाराची नोकरी मिळाल्याची अनेक उदाहरणे ऐकायला मिळाली.

हां.. अजून एक राहिले... या परिसरातून २०-२५ मिनिटाच्या पायी अंतरावर असलेल्या वेळणेश्वर समुद्र किनाऱ्याचे दर्शनही येथून सहज होते. वसतीगृहाच्या बालकनीत उभे राहून, हातात अभियांत्रिकीचे पुस्तक घेऊन, त्या समुद्राकडे बघण्याचे भाग्य किती विद्यार्थ्यांना मिळत असेल असा न्यूनगंड मनात ठेऊनच इथून बाहेर पडावे लागते...

विद्या प्रसारक मंडळाचे वेळणेश्वर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाने लहान गावातून, तालुक्यातून, शहराकडे येणारा विद्यार्थी वर्ग पुन्हा लहान गावी वळविला आणि ज्या व्यवस्था मोठमोठ्या शहरांच्या मोठमोठ्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नसतील अशी व्यवस्था इथे निर्माण करून लहान गावातल्या, तालुक्यातल्या हुशार विद्यार्थ्यांना त्याच्या घराच्या, गावाच्या, तालुक्याच्या आसपास अभिमान वाटेल असे महाविद्यालय निर्माण करून दिले आहे.

या महाविद्यालयाने जवळपास ६०-६५ लोकांना रोजगार, नोकरी दिली आहे. यासाठी विद्या प्रसारक मंडळाचे व विशेष म्हणजे डॉ. विजय बेडेकर यांचे खरंच कौतुक करायला हवे व आभारही व्यक्त करायला हवे.

**- प्रा. विनोद एच. वाघ**
वि.प्र.मं.चे टी एम सी विधी महाविद्यालय, ठाणे

•••

(पृष्ठ क्र.९ वरून - **श्रीराम : चारित्र्य-मंजिरी)**

त्यापूर्वी लिहिलेल्या महाभारतातील वनपर्वात पांडवांना संपूर्ण रामायण सांगण्यात आले, त्यात सीतात्याग नाही. असे अनेक मुद्दे राम केशव रानडे यांनी दिले आहेत. असो.

आपल्या प्रस्तुत 'श्रीरामःचारित्र्य-मंजरी' या ग्रंथात उत्तर रामायण असण्याचे कारण वर स्पष्ट केले आहे. सीतात्यागानंतरही, सीता अदृश्य रूपात श्रीरामाबरोबरच असे, इतरांना दिसत नसे असे या ग्रंथात स्पष्ट केले आहे. अनेक गोष्टी लिहिता येतील त्यापेक्षा हा ग्रंथ मुळातूनच वाचला पाहिजे असेच म्हटले पाहिजे. या उत्कृष्ट ग्रंथाला एक छोटेसे गालबोट म्हणजे काही ठिकाणी थोडे मुद्रण दोष राहिले आहेत, ते पुढील आवृत्तीत दुरुस्त व्हावेत, असो.

एकूण पाहता या उत्कृष्ट पुस्तकासाठी, मूळ लेखक, मुख्यतः अनुवादक, मुखपृष्ठकर्ता, मुद्रक, प्रकाशक हे सर्व अभिनंदनास पात्र आहेत अशी नोंद करून हा ग्रंथ-परिचय संपवितो.

**- डॉ. हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर**
बी २/२०, सरिता वैभव, सिंहगड रोड, पुणे -४११०३०
दूरध्वनी : ०२०-४२५०४२७
Email - hdkopardekargmail.com

आयुष्याच्या लढाईत 'बाबा' नावाची 'तलवार' आणि 'आई' नावाची 'ढाल'
सोबत असली की 'संघर्षाला' सहज हरवता येते.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**पर्यावरण संवर्धनासाठी कांदळवनाचे जतन**

दि.२४ व २५ जानेवारी आणि १६ व १७ फेब्रुवारी रोजी Innerwill club of Dombivali West तर्फे 'पर्यावरण रक्षणासाठी कांदळवनाचे जतन ' या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. हा कार्यक्रम इ.७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन, तर इ.९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑफलाइन पद्धतीने सादर करण्यात आला. या कार्यक्रमात सौ. धोत्रे, सौ. दातार, श्री. शिरापुरी इ. शिक्षक उपस्थित होते.

**अभिनंदन!!! (२५ फेब्रुवारी २०२२)**

मध्य प्रदेशातील पंचमढी येथे भारत स्काऊट-गाईड प्रशिक्षण केंद्रातर्फे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सिग्नलिंग, मॅपिंग, पायोनियर आणि फर्स्ट एड अशा चार अभ्यासक्रमांचे आयोजन केले होते. महाराष्ट्र, गुजरात, तेलंगण, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम, छत्तीसगड आणि बिहार असे एकूण आठ राज्ये सहभागी झाली होती. या राज्यांतून ६४ स्काऊट आणि ३४ गाईड शिक्षकांचा सहभाग होता. यामधून आपल्या शाळेतील शिक्षिका कल्पना बोरवणकर यांची पायोनियर आणि सुवर्णा चव्हाण यांची सिग्नलिंग या अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून, त्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**अभिनंदन!**

'शिक्षण संवेदन' तर्फे राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार दिला जातो. सन २०२२ मधील राज्यस्तरीय सावित्रीबाई आदर्श शिक्षिका पुरस्काराने आपल्या शाळेच्या मा. मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे यांना सन्मानित करण्यात आले. आपल्या कुशाग्र बुद्धीचा व नावीन्यपूर्ण अध्यापन प्रवृत्तीचा उत्तम समन्वय साधून विद्यार्थ्यांप्रती, समाजप्रती, शिक्षण प्रणालीप्रती चैतन्यशील अध्यापनासाठी सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रम आचार्य अत्रे नाट्यगृहात संपन्न झाला.




त्याचबरोबर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे दि. २७ फेब्रुवारी मराठी दिनानिमित्त मराठी माध्यमाच्या शाळांच्या तीन मुख्याध्यापिका, सहा शिक्षिका आणि एक उद्योजिका यांचा सत्कार करण्यात आला. यात आपल्या शाळेच्या मा. मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रम गडकरी रंगायतन मध्ये संपन्न झाला.

सर्वांतर्फे हार्दिक अभिनंदन!!

**'मराठी दिन' दि.२७ फेब्रुवारी २०२२**

शाळेत इ. ५वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी मराठीच्या शिक्षकांसह 'मराठी दिन' उत्साहात साजरा केला. सकाळ विभागात सौ. साधना जोशी यांनी, तर दुपार विभागात सौ. साक्षी दातार यांनी कुसुमाग्रजांची माहिती सांगितली.

सुख एकट्याने भोगू नये, व दुःख दुसऱ्याला वाटायला जाऊ नये.



इ.६ वीच्या विद्यार्थ्यांनी कथाकथन सादर केले. इ.८ वी च्या विद्यार्थ्यांनी उताऱ्याचे प्रकट वाचन केले. इ.७वी च्या विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या लेखकांची माहिती सांगितली, इ.५ वी च्या विद्यार्थ्यांनी कवितागायन केले, तर काही विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण केले. असा एकंदर भरगच्च कार्यक्रम झाला. सकाळ विभागात सौ. सुमिता माने यांनी, तर दुपार विभागात सौ. संगीता तातळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच मा. मुख्याध्यापिका सौ. वंदना अडसुळे यांनी मराठी दिनानिमित्त उत्तम मार्गदर्शन केले.

**राष्ट्रीय विज्ञान दिन (२८ फेब्रुवारी २०२२)**



२८ फेब्रुवारी १९३० या दिवशी डॉक्टर सी. व्ही. रामन या थोर भारतीय वैज्ञानिकांना त्यांच्या प्रकाशकिरणांच्या संशोधनासाठी (रामन इफेक्ट) जगातील सर्वोच्च समजला जाणारा नोबेल पुरस्कार प्राप्त झाला. म्हणून आपण या दिवशी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करतो.

त्या निमित्ताने आज इ. ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांनी शाळेत विज्ञान दिन साजरा केला. मा. मुख्याध्यापिका सौ. अडसुळे यांनी सरस्वती पूजन करून, तसेच डॉ. सी. व्ही. रामन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधत या दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. इ. ७ वी च्या विद्यार्थिनींनी विज्ञान गीत सादर केले. इ. ९ वी तील स्वरा दाभाडे या विद्यार्थिनीने 'चमत्कारामागील विज्ञान' प्रयोगातून सादर केले. तसेच विद्यार्थ्यांनी विविध शास्त्रज्ञांची माहिती मराठीतून तसेच इंग्रजीतून सादर केली. श्री. देवघरे यांनी विज्ञानाची उपयुक्तता सांगितली.

कार्यक्रमात शेवटी मा. उपमुख्याध्यापिका कु. वाघुले यांनी आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शेलार यांनी केले.

**६) अभिनंदन !**



साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत ठाणे शहराचे नाव उंचावणाऱ्या आपल्या शाळेतील साहित्यप्रिय शिक्षिका साधना जोशी यांना 'ठाणे गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले. दि.२८ फेब्रुवारी २०२२ रोजी ठाण्यातील गडकरी रंगायतन नाट्यगृहात हा गौरव समारंभ संपन्न झाला. साधना जोशी यांचे हार्दिक अभिनंदन! आणि साहित्य क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी भरघोस शुभेच्छा !

**जागतिक महिला दिन विशेष**

दि. ८ मार्च २०२२ जागतिक महिला दिनानिमित्त 'ठाणे भारत स्काऊट-गाईड जिल्हा कार्यालयात' ठाणे जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या पन्नास मैत्रिणींशी

सुखात इतरांना वाटेकरी केले तर ते वाढत राहते, दुःखात इतरांचे सहकार्य मिळाले तर ते कमी होते.

'स्त्री काल व आज' या विषयावर आपल्या शाळेतील शिक्षिका साधना जोशी यांनी संवाद साधला. सर्व मैत्रिणींकडून साधना जोशी यांचे भरभरून कौतुक झाले.



तसेच सुयोग प्रतिष्ठानच्या वतीने (श्री. सुयोग व सौ. प्रिया मालुसरे) आयोजित अशोक हांडे यांच्या 'अमृत लता' या अतिशय देखण्या व भव्य कार्यक्रमात हजारो सुज्ञ नागरिकांच्या उपस्थितीत मा. महापौर नरेश दादा म्हस्के, माजी महापौर मिनाक्षी ताई शिंदे, उपमहापौर पल्लवी ताई कदम यांच्या हस्ते 'ती' च्या कर्तृत्वाचा गौरव अंतर्गत महिला दिनानिमित्त साधना जोशी यांच्या कर्तृत्वाचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



तसेच वसंत विहार ठाणे येथे महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात स्थानिक नगरसेविका जयश्री ताई डेव्हिड यांनी साधना जोशी यांचा सत्कार केला.

साधना जोशी यांचे हार्दिक अभिनंदन!

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

### १४ जानेवारी २०२२ मकर संक्रांत

इंग्रजी वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांत. १३ जानेवारीला आभासी तासिकांमधे (online) हा सण साजरा करण्यात आला. सर्व मुलांनी काळ्या रंगाचे कपडे परिधान केले होते. मकर संक्रांत सणाचे प्रत्येक राज्यातील नाव व साजरा करण्याच्या पद्धतींची माहिती मुलांना चित्राद्वारे देण्यात आली.

मकर संक्रांतनिमित्त खालील उपक्रम घेतले गेले.

**नर्सरी :** पतंग (स्टेन्सिल) वर भेंडीने ठसे काम (Printing)

**जुनियर :** घोटीव कागद वापरून पतंग करणे.

**सिनीयर :** विविध आकाराचे, रंगाचे पतंगाचे चित्र काढणे.

### २६ जानेवारी २०२२ : प्रजासत्ताक दिवस

२६ जानेवारीला साजरा होणारा ७३ वा प्रजासत्ताक दिवस २५ जानेवारीला आभासी शाळेच्या (online school) माध्यमातून साजरा केला गेला. मुलांनी तिरंगी रंगाचे कपडे परिधान केले होते. त्या दिवसाचे महत्त्व व राजधानी दिल्लीत तो कसा साजरा होतो या बद्दलची माहिती मुलांना चित्रांद्वारे देण्यात आली. राष्ट्रगीताने तासिकेची सांगता झाली.

**नर्सरी :** तिरंगी रंगाचे कागद फुलाच्या स्टेंसिलमध्ये चिकटवणे.

**जुनियर :** आइसस्क्रीमच्या काड्यांना तिरंगी रंगात रंगवून चिकटवणे.

**सिनीयर :** तिरंगी रंगाच्या कागदापासून चेन तयार करणे.

सिनीयरच्या प्रत्येक गटातील काही मुलांना पुढील विषयांवर ४ ते ५ वाक्ये बोलण्यास सांगण्यात आली.

---

असत्य दुबळे असते. स्वतःच्या अस्तित्वासाठी त्याला सत्याचे साहाय्य घ्यावे लागते.

१) प्रजासत्ताक दिवस

२) माझे राष्ट्र : महाराष्ट्र

३) भारतातील विविध प्रेक्षणीय स्थळे. (ताजमहल, सूर्य मंदिर, अजंठा एलोरा इ.)

इतर काही उपक्रम :

१) २८ जानेवारी : सैंडविच उपक्रम.

२) ४ फेब्रुवारी : फुलांचा हार बनविणे.

३) ८ फेब्रुवारी : कागदाची भिंगरी तयार करणे.

४) १५ फेब्रुवारी : फळांचे सॅलेड.

५) २५ फेब्रुवारी : दही लावणे व लस्सी बनवणे

सिनीयर के. जी.च्या मुलांनी कृतीसहित सर्व तयारी करून शिक्षक व पालकांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचा आनंद लुटला.

• **सरकारी आदेशानुसार** मुलांना कोव्हीड १९ चे नियम पाळून शाळेत येण्याची मुभा मिळाली. या संबंधी पालकांचे मत जाणून, तसेच निर्जंतुकीकरण (सॅनिटाईझेशन) स्वच्छता या बद्दल सर्व सरकारी नियमांचे पालन करून, काळजी घेऊन ३१ जानेवारी पासून पूर्व प्राथमिक विभागाच्या मुलांचे प्रत्यक्ष शाळेत येऊन (offline) शिक्षण सुरू झाले.

**३१ जानेवारी ते ११ फेब्रुवारी**

सोमवार व मंगळवार (२ दिवस) सिनीयर १०:४५ ते ११:४५

बुधवार व गुरूवार (२ दिवस) ज्युनियर १०:४५ ते ११:४५

शुक्रवारी (१ दिवस) नर्सरी १०:४५ ते ११:४५

या प्रत्यक्ष (offline) शाळेनंतर आभासी माध्यमाद्वारेही (online) शाळेच्या तासिका घेण्यात आल्या.

**१४ फेब्रुवारी पासून – १०:१५ ते १२:१५**

| | | |
|---|---|---|
| सोमवार, बुधवार व शुक्रवारी | प्रत्यक्ष (offline school) | ज्युनियर व नर्सरी |
| मंगळवार व गुरुवार | आभासी (online school) | |
| मंगळवार व गुरूवार व शनिवार | प्रत्यक्ष (offline school) | सिनीयर |
| सोमवार, बुधवार व शुक्रवारी | आभासी (online school) | |

सर्व विभागाची मुले प्रत्यक्ष शाळेत येऊन शिक्षणाचा आनंद घेत आहेत.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**मराठी राजभाषा गौरव दिनाचे यशस्वी आयोजन**

दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयामध्ये प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक महोदयांच्या मार्गदर्शनाखाली मराठी राजभाषा गौरव दिन सोहळा संपन्न झाला.

मराठी भाषा आणि साहित्य विभागातर्फे सकाळी ११ वाजता आभासी मंचाद्वारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक महोदया होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक महोदया म्हणाल्या, ''ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विष्णू वामन शिरवाडकर तथा कुसुमाग्रजांचा वारसा विद्यार्थ्यांनी समर्थपणे पुढे चालवावा, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. कुसुमाग्रजांचा जन्मदिन आपण मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून साजरा करतो. आज विद्यार्थ्यांनी कवितांतून ज्या प्रकारे स्वतःला व्यक्त केले त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.''

यावेळी उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, प्रा. संतोष राणे यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

काव्यपुष्पांजली कार्यक्रमात हिंदी भाषा विभागप्रमुख डॉ. अनिल ढवळे यांनी 'गाभारा' आणि प्रा. राजश्री माने यांनी 'दूर मनोऱ्यात' कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध कवितांचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रुपेश महाडीक यांनी केले. प्रा. राजश्री माने यांनी उपस्थितांचे आभार मानले. या काव्यपुष्पांजली सोहळ्याला अनेक विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.

**मराठी राजभाषा गौरव दिनाचे कात्यायनमध्ये आयोजन**



दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयामध्ये प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक महोदयांच्या मार्गदर्शनाखाली मराठी राजभाषा गौरव दिन सोहळा सकाळी १० वाजता कात्यायन सभागृहात संपन्न झाला. प्रमुख वक्ते म्हणून लेखक, समीक्षक डॉ. अनंत देशमुख उपस्थित होते. 'अलौकिक प्रतिभावंत- कुसुमाग्रज' या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, माहिती आणि ग्रंथालयशास्त्र प्रमुख प्रा. नारायण बारसे, डॉ. अनिल ढवळे, डॉ. प्रकाश जंगले, प्रा. सुहासिनी दहीवले, प्रा. रोहिणी डोंबे, प्रा. शिशिर आंगणे, प्रा. राजश्री माने-जाधव, प्रा. रुपेश महाडिक, प्रा. संतोष राणे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सर्व भेद विसरून भारतीयत्व जपले पाहिजे : डॉ. अशोक मोडक**

**जोशी बेडेकर महाविद्यालयात सांस्कृतिक महोत्सव संपन्न**



गुरूवार, २४ फेब्रुवारी २०२२ रोजी 'भारताच्या सांस्कृतिक विविधतेतेचे जतन करताना येणारी आव्हाने' या विषयावर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व माजी आमदार डॉ. अशोक मोडक प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते. कार्यक्रमासाठी केल्याने भाषांतर या मासिकाच्या संपादिका व जर्मन भाषा तज्ज्ञ डॉ. सुनंदा महाजन यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. संगीता मोहंती यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले आणि महोत्सवा मागची भूमिका विशद केली. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी भारतीय सांस्कृतिक विविधता या विषयावर आपले मत मांडले. डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी डॉ. अशोक मोडक यांची थोडक्यात ओळख करून दिली.

आपल्या व्याख्यानात डॉ. अशोक मोडक यांनी, 'भारताच्या सांस्कृतिक विविधतेचे जतन करताना येणारी आव्हाने' तसेच, 'स्वातंत्र्याच्या ७५व्या अमृत महोत्सवी भारतीय म्हणून आपली जबाबदारी' यावर आपले मत मांडले. स्वामी विवेकानंदांचा संदर्भ देत ते म्हणाले की, 'भारताच्या सांस्कृतिक विविधतेचे जतन करण्यासाठी सध्याच्या घडीला शिक्षण पद्धती ही विद्यार्थी केंद्रित असणे गरजेचे आहे, त्याचबरोबर या अमृत महोत्सवी वर्षात आपण स्वातंत्र्याला आत्मनिर्भरतेकडे नेण्याची प्रतिज्ञा घेतली पाहिजे. सर्व भेद विसरून भारतीयत्व जपले पाहिजे.' त्यांनी 'भारतीय भुत्वा भारतम् भजेत्' हा संदेश दिला. पुढे ते म्हणाले की, 'मानवी जीवन हे उपभोगप्रियता, स्वच्छंदता आणि संस्कृतीहीनता या तीन गोष्टींमध्ये गुरफटलेले आहे. देश विघातक शक्ती चीन व पाकिस्तानच्या रूपाने आपल्याला नेहमीच प्रतिकूल आहेत, तसेच संस्कृतीशून्यतेच्या वाटेवर जाणाऱ्या आपल्या समाजाला शुद्ध भारतीय मूल्यांची अत्यंत गरज आहे. आपल्या प्रश्नांना उत्तर आपल्याच तत्त्वज्ञानातून शोधले पाहिजे. परकीय विचारांच्या ओंजळीने पाणी पिणे हा उपाय असू शकत नाही', असे मोडक म्हणाले.

कार्यक्रमाच्या चर्चासत्रासाठी सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या माजी जर्मन भाषा विभागप्रमुख डॉ. सुनंदा महाजन या उपस्थित होत्या. त्यांनी 'सांस्कृतिक विविधतेत भाषेची भूमिका' या विषयावर आपले मत मांडले. त्या म्हणाल्या की 'भाषा ही आपल्याला आपला भूतकाळ आणि भविष्यकाळाशी जोडते. त्याचबरोबर मानवाला आपले विचार, आपली संस्कृती आणि आपले अनुभव यांची देवाणघेवाण करून आपल्या संस्कृतीचे जतन करण्यात मदत करते.'

यानंतर डॉ. मोहसिना मुकादम, तनुश्री भावना, लोपामुद्रा मोहंती या परिसंवादासाठी उपस्थित होत्या. डॉ. मोहसिना मुकादम यांनी, 'देशातील अन्न विविधता' तर तनुश्री भावना यांनी 'लिंग विविधता' तर लोपामुद्रा मोहंती यांनी 'भाषेतील विविधता' या विषयांवर चर्चा केली. त्यानंतर विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पाडून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, डॉ. संगीता मोहंती, डॉ. विमुक्ता राजे, डॉ. प्रशांत धर्माधिकारी, प्रा. मानसी जंगम यांनी सहकार्य केले.

### डॉ. वा. ना. बेडेकर आंतरमहाविद्यालयीन राज्य स्तरीय 'वादविवाद स्पर्धा'



जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्यावतीने जनसंज्ञापन विभागातर्फे डॉ. वा. ना. बेडेकर आंतरमहाविद्यालयीन राज्य स्तरीय 'वादविवाद स्पर्धा' सोमवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. ती यशस्वीरित्या पार पडली. कोरोनाचे सावट असताना ही स्पर्धा ऑनलाईन स्वरूपात घेण्यात आली.

मुंबई, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मिरज, कोल्हापूर, रत्नागिरी अशा राज्यातील विविध भागांतून अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.

'भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी टप्प्यात प्रसारमाध्यमे जबाबदार आहेत का?' हा स्पर्धेचा विषय होता. यावरील मते विद्यार्थ्यांनी उत्तमरीत्या मांडली.

'आपण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी टप्प्यात आलो ह्या मध्ये प्रसार माध्यमांची जबाबदारी काय आहे?' असं विचारल्यास 'हो, जबाबदार आहेत', असे उत्तर जितकं बरोबर आहे तितकंच 'नाही' हेही येतं... कारण प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. प्रसारमाध्यमे जितकी महत्त्वाची आहेत, तितक्याच त्यांच्या त्रुटी देखील आहेत, अशी मते मांडली गेली.

स्पर्धेला परीक्षक म्हणून ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक श्री. विनोद पितळे, तसेच ज्येष्ठ पत्रकार संदीप प्रधान लाभले होते. वादविवाद स्पर्धेचे प्रथम पारितोषिक बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई येथील आदित्य मोरे आणि समृद्धी राऊत यांनी पटकावले, तर द्वितीय पारितोषिक रुईया कॉलेज, मुंबई मधील श्रेया जोशी आणि आदित्य देशमुख यांना मिळाले. तर तृतीय पारितोषिकाचे मानकरी वि. ग. वझे केळकर महाविद्यालय मुंबई मधील पार्थ डोंगरे आणि विशाखा ढोपे हे झाले. तसेच विशेष उल्लेखनीय म्हणून पी ए एच युनिव्हर्सिटी सोलापूर मधील सौरभ वाघमारे आणि भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर मधून संकेत पाटील यांनी मान पटकावला.

जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागाचे उपप्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी विशेष मार्गदर्शन केले. उपप्राचार्य सुभाष शिंदे, ग्रंथपाल नारायण बारसे यांची उपस्थिती लाभली होती.

प्रा. डॉ. विमुक्ता राजे, सह प्रा. स्वप्नील मयेकर, सह प्रा. मानसी जंगम, तांत्रिक सहाय्यक महेश दूधभाते, फोटोग्राफर चिन्मय शिवडीकर, स्वयंसेवक साक्षी जाधव, आदित्य पंडित, समीक्षा चौधरी, मृण्मयी समेळ, वेदिका कुंटे या सर्वांच्या मदतीने डॉ. वा. ना. बेडेकर वादविवाद स्पर्धेचे आठवे वर्ष यशस्वीरीत्या पार पडले.

• विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या जनसंज्ञापन विभागाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी पार्थ बागुल याच्या 'मास्क' या लघुपटाची निवड २५ ते २७ मार्च दरम्यान भोपाळ येथे आयोजित भारतीय चित्रसाधना चित्रपट महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी झाली आहे. त्याचबरोबर या लघु चित्रपटासाठी उत्कृष्ट दिग्दर्शक व उत्कृष्ट लघुपट या श्रेणीमध्ये नामांकने मिळाली आहेत. भारतीय चित्र साधना ही संस्था चित्रपट क्षेत्रात भारतीय मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यासाठी काम करते. तसेच राष्ट्रीय पातळीवर लघुपटमहोत्सव भरवला जातो.




या लघुपटाबद्दल बोलताना पार्थ म्हणाला की, 'माझ्या सारख्या व्हिलेज बॉयकडे कोणतेही अत्याधुनिक साधने नसतानाही मी माझा विचार मांडू शकलो आणि याची नोंद चित्रसाधनेन घेतली याचा मला आनंद वाटतो आहे. लघुपट बनवताना अनेक अनुभव आले, अनेक लोकांना भेटता आले. त्यांच्या समस्या आणि भावना जाणून घेता आल्या. करोना हे जागतिक संकट होते, मात्र संकटातही विद्यार्थ्यांना संधी शोधता आली पाहिजे.'

या कामगिरीसाठी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी पार्थ बागुल याचे अभिनंदन केले आणि त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

---

**प्रा. रोहित बापट नेट परीक्षा उत्तीर्ण**

जोशी-बेडेकर महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील प्राध्यापक श्री. रोहित बापट नुकतीच नेट परीक्षा उत्तीर्ण झाले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक व विभाग प्रमुख डॉ. रश्मी अग्निहोत्री यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**मराठी साहित्य समृद्ध करण्यात कुसुमाग्रजांचे योगदान महत्त्वाचे !**



ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनी काव्य, नाटक, कथा, कादंबरी, इत्यादी सर्वच वाङ्मय प्रकार यशस्वीपणे हाताळले. मराठी साहित्य समृद्ध करण्यात कुसुमाग्रजांचे योगदान मोठे आहे. असे गौरवोद्गार लेखक, समीक्षक डॉ. अनंत देशमुख यांनी काढले.

दिनांक २८ फेब्रुवारी २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयामध्ये प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक महोदयांच्या मार्गदर्शनाखाली मराठी राजभाषा गौरव दिन सोहळा सकाळी १० वाजता कात्यायन सभागृहात संपन्न झाला.त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून लेखक, समीक्षक डॉ. अनंत देशमुख उपस्थित होते. 'अलौकिक प्रतिभावंत- कुसुमाग्रज' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्याचा समग्र आढावा घेतला. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

उपप्राचार्य सुभाष शिंदे, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, माहिती आणि ग्रंथालयशास्त्र प्रमुख प्रा. नारायण बारसे, डॉ. अनिल ढवळे, डॉ. प्रकाश जंगले, प्रा. सुहासिनी दहीवले, प्रा. रोहिणी डोंबे, प्रा. शिशिर आंगणे, प्रा. राजश्री माने- जाधव, प्रा. रुपेश महाडिक, प्रा. संतोष राणे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**रत्नमंजुषा पुरस्काराने कोमल बापट- फडके सन्मानित**



संस्कृत विषयात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या जोशी बेडेकर कनिष्ठ महाविद्यालयातील संस्कृत शिक्षिका सौ. कोमल बापट-फडके यांना 'रत्नमंजुषा पुरस्कार' ज्येष्ठ व्याख्यात्या सौ. धनश्री ताई लेले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रामनारायण रुईया महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे संस्कृत दिन ह्यावर्षी ३ मार्च २०२२ रोजी संपन्न झाला. डॉ. मंजुषा गोखले माजी संस्कृत विभागप्रमुख ह्यांच्या नावे रत्नमंजुषा पुरस्कार संस्कृतचा हात धरून अजून एखाद्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या माजी विद्यार्थिनी किंवा विद्यार्थ्याला दिला जातो.

सौ. कोमल बापट- फडके उत्तम कीर्तन करतात. विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात संस्कृत विषयाच्या अध्यापिका आहेत. महाराष्ट्रातील विविध ठिकाणी त्यांचे कीर्तनाचे कार्यक्रम लोकमान्य ठरले आहेत. रामायण-महाभारतातील ही सूत परंपरा पुढे कीर्तनात परिणत झाली आणि ते करण्याचा त्या प्रयत्न करीत आहेत. या त्यांच्या अथक परिश्रमासाठी रत्नमंजुषा हा मानाचा पुरस्कार मिळाला आहे. दरवर्षीप्रमाणे हा सोहळा स्वायत्त रामनारायण रुईयाच्या जी-१२ मध्ये संपन्न झाला. यावेळी ज्येष्ठ व्याख्यात्या सौ. धनश्री ताई लेले प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. संस्कृत ऋतायन संस्थेच्या प्रमुख तरंगिणी खोत मॅडम आणि संस्कृत विभाग प्रमुख डॉ. सौ. वैशाली दाबके ह्या दोन संस्कृत क्षेत्रातील विदूषींनी संयोजन केले होते. रुईया कॉलेज त्यातही संस्कृत विभाग विशेषतः नेहमीच गुणांची दखल घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतो. कोमल बापट-फडके यांना रत्नमंजुषा पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेतील ३३ वे पुष्प ज्येष्ठ परराष्ट्रधोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर.**

**रशिया-युक्रेन युद्धामध्ये भारताची तटस्थ भूमिका सयुक्तिक : डॉ. शैलेंद्र देवळाणकर**



स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेतील ३३ वे पुष्प ज्येष्ठ परराष्ट्रधोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी 'रशिया-युक्रेन युद्ध : आंतरराष्ट्रीय भूमिका व आव्हाने' या विषयावर गुंफले.

विद्या प्रसारक मंडळ संचालित जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयामध्ये दिनांक ४ मार्च २०२२ रोजी आभासी माध्यमाने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानमालेची भूमिका विशद करताना डॉ प्रशांत धर्माधिकारी म्हणाले की, स्वर्गीय डॉ. वा. ना. बेडेकर यांचे ठाण्याच्या सांस्कृतिक जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. ते एक वैद्यकीय व्यावसायिक, शिक्षण तज्ज्ञ, संस्था उभ्या करणारे द्रष्टे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी महाविद्यालयाने सुरू केलेला ज्ञानयज्ञ म्हणजे ही स्मृती व्याख्यानमाला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी युद्धाचे मळभ दाटून आलेले असताना संयुक्तिक भूमिका घेऊन शांती प्रस्थापित होण्यासाठी सर्व राष्ट्रांनी काम करायला हवे असे मत व्यक्त केले.

आपल्या व्याख्यानामध्ये डॉ. शैलेंद्र देवळाणकर म्हणाले की, 'रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना सोवियेत संघाला गतवैभव प्राप्त करून द्यायचे आहे. तसेच, युक्रेन हा देश नाटोचा सदस्य होऊ नये म्हणून पुतीन यांचा प्रयत्न सुरू आहे. या गोष्टींचा परिपाक म्हणजे सध्या सुरू असलेले रशिया व युक्रेनमधील युद्ध होय. अमेरिकेला युरोपवर वर्चस्व हवे आहे, त्यासाठी अमेरिका नाटोकडे पाहते. नाटो या संघटनेचा विस्तार पूर्वेकडे होणार नाही असा करार अमेरिकेने केला होता. मात्र अमेरिकेने त्याचे पालन केले नाही. अमेरिकेला रशियाचा वाढता प्रभाव रोखावयाचा असल्यामुळे, तसेच आपले वाढते वर्चस्व युरोप मध्ये ठेवण्यासाठी अमेरिका प्रयत्नशील आहे.' डॉ. देवळाणकर पुढे म्हणाले की, ''अमेरिकेचे परराष्ट्र धोरण हे 'एखाद्या व्यक्तीला किंवा

राष्ट्राला खलनायक बनवायचे, इतर देशांना त्याची भीती दाखवायची व आपले हितसंबंध साधायचे' असे राहिले आहे. याचा प्रत्यय इराकमध्ये सद्दाम हुसेन, ओसामा बिन लादेन, इस्लामिक स्टेट यांना खलनायक ठरवून युद्ध लादण्याचा प्रयत्न अमेरिका करते. संप्रत पुतीन यांना नवा हिटलर घोषित करून पाश्चिमात्य माध्यमं कामं करताना दिसतात. अमेरिका हे सर्व करताना प्रत्यक्ष युद्धात सहभागी होत नाही. अमेरिकेची संसाधन व मनुष्यबळाची कमीत कमी हानी होईल याचा विचार अमेरिका करते. 'अमेरिका फर्स्ट' या धोरणावर काम करताना अफगाणिस्तानातून अमेरिकेने अशाच प्रकारे तडकाफडकी आपल्या फौजा परत मागवल्या व तालिबानचा उदय झाला.''

''आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचे न्याय्य वितरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना महत्त्वाच्या ठरल्या असत्या; मात्र सध्या राष्ट्र संघ , विश्व आरोग्य संघटना इत्यादी संस्था गतप्रभ झाल्या आहेत. किंबहुना या अमेरिका, रशिया, चीन इत्यादी देशांच्या हातातील बाहुले झाल्या आहेत.''

''दुसऱ्या महायुद्धानंतर 'छोट्या राष्ट्रांचा सुरक्षारक्षक' म्हणून अमेरिका पुढे आला होता. मात्र बाईडन व ट्रम्प यांच्या राजवटीत 'अमेरिका फर्स्ट' ही पॉलिसी अवलंबल्यामुळे लहान देशांचे रक्षण कोण करणार असा प्रश्न सर्वच देशांसमोर उभा आहे. याची परिणती प्रत्येक देशाने आपलं संरक्षण बजेट वाढविण्यात झाली. यामधून देशादेशांमधील भीषण अशी शस्त्रास्त्र स्पर्धा निर्माण झाली आहे . शिक्षण, आरोग्य, आर्थिक विकास या मूलभूत गोष्टींवर खर्च करण्यापेक्षा शस्त्रास्त्रांच्या खरेदी व विकासासाठी पैसा वापरणे हा अग्रक्रम ठरत आहे. या धामधुमीच्या जागतिक परिप्रेक्षात चीन आपला फायदा नक्कीच करून घेणार असे दिसते. कोरोना नंतरच्या पार्श्वभूमीवर चीनची भूमिका पारदर्शी नाही. कोरोना बद्दलची माहिती चीन जगाला देण्यास तयार नाही. अमेरिकेची चीनवर आर्थिक निर्बंध टाकण्याची हिंमत नाही. कारण त्यांच्यामधील व्यापारी हितसंबंध!

या परिप्रेक्षात भारताने रशिया युक्रेन युद्धामध्ये तटस्थ राहण्याची भूमिका घेतली आहे ती अत्यंत सयुक्तिक आहे'' असे डॉ. देवळाणकर म्हणाले.

''भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच युद्ध सुरू असताना युक्रेनमधील विद्यार्थ्यांना सुखरूप भारतात आणण्यासाठी 'मिशन गंगा' च्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे अभूतपूर्व यश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व पुतीन यांची चर्चा होऊन युद्धजन्य परिस्थितीत देखील भारतीय विद्यार्थ्यांना रशिया युक्रेन मधून बाहेर पडण्यासाठी मदत करण्यात आली आहे.

युद्धाचा सगळ्यात मूलगामी परिणाम कच्च्या तेलाच्या वाढत्या दरांवर होत असतो व सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन व्यवहारावर त्याचा परिणाम होत असतो असे डॉ देवळाणकर म्हणाले. युद्ध जर थांबले नाही तर येत्या काळात पेट्रोल व डिझेलच्या किंमती वाढतील आणि याचा आंतराष्ट्रीय व्यापारावर विपरीत परिणाम होईल. युक्रेन मध्ये सत्ता पालट करून रशियाधार्जिणा पंतप्रधान बसवल्या शिवाय रशिया युद्ध थांबवणार नाही'' असेही भाकीत यावेळी डॉ. देवळाणकर यांनी केले.

प्रश्नोत्तराच्या सत्रानंतर पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला. या व्याख्यानासाठी उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल नारायण बारसे, सर्व विभाग प्रमुख, समन्वयक, विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत धर्माधिकारी यांनी केले. हे व्याख्यान जिज्ञासूंसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या

यूट्यूब चैनल वर उपलब्ध करण्यात आले आहे असे व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. महेश पाटील म्हणाले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय संख्याशास्त्र विभागातर्फे पालक सभा संपन्न.**

प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन पालक सभा २४ जानेवारी २०२२ व ०१ जानेवारी २०२२ रोजी संपन्न झाली. या सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा संदर्भात महाविद्यालया तर्फे राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमांबद्दल चर्चा करण्यात आली, महाविद्यालयाद्वारे चालवल्या जाणाऱ्या विविध विद्यार्थीभिमुख उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच व्याख्यानांना उपस्थित राहण्याचे महत्त्व सांगितले आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या उपस्थितीच्या नोंदीची देखील माहिती देण्यात आली. या सभेला प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष विज्ञान शाखेचे एकूण ५५ व ३५ सभासद उपस्थित होते.

**स्टुडंट आउटरीच मेंटॉर प्रोग्राम बांदोडकर विभागात संपन्न २९ जानेवारी २०२२**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील सांख्यिकी विभाग, गणितविभाग, आ.य.टी. आणि सी.ए.स. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २९ जानेवारी २०२२ रोजी ऑनलाइन कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला कु. आस्था दलाल, (मार्गदर्शक टुगेदरच्या मुंबई कार्यालयात कार्यक्रम व्यवस्थापक) या प्रमुख वक्त्या उपस्थित होत्या. या कार्यशाळेचे सूत्र संचालन कु. भाग्यश्री आणि श्री. वेदांग रानडे यांनी केले.

नोकरी शोधण्यासाठी उपयुक्त असलेल्या आवश्यक कौशल्याविषयी विद्यार्थ्यांना थोडक्यात माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सदर कार्यशाळेला ३७८ सभासद उपस्थित होते.



**"BASICS OF R SOFTWARE" ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न**

Basics of R Software ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रम ८ फेब्रुवारी ते २४ फेब्रुवारी २०२२ या कालावधीत संपन्न झाला. सदर दोन आठवडे अभ्यासक्रमाची प्रमुख उद्दिष्टे विद्यार्थ्यांना R मधील मूलभूत नियमित अभिव्यक्तींची ओळख करून देणे, तसेच तक्ते, प्लॉट आणि मूलभूत डेटा विश्लेषण प्रक्रिया तयार करण्याबद्दल ज्ञान देणे, सर्व पारंपरिक सांख्यिकीय मॉडेल आणि विश्लेषण चाचण्या करण्यासाठी एकाधिक प्रतिगमन मॉडेल आणि प्रक्रिया समजून घेणे..

वास्तविक जीवनातील डेटाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्याचा अनुभव विकसित करण्यात आला.

सौ. सुमैया ए. शेख (प्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, बांदोडकर महाविद्यालय) कु. प्रियांका एम. चव्हाण (सहायक प्राध्यापक, बांदोडकर महाविद्यालय) कु. वैशाली जे. देशमुख (सहायक प्राध्यापक, बांदोडकर महाविद्यालय) कु. सबा पांगारकर (सहायक प्राध्यापक, बांदोडकर महाविद्यालय) यांनी या अभ्यासक्रमाचे

आयोजन केले होते. एकूण ४८ विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते.



**जैवरसायनशास्त्र विभागातर्फे 'उडान – परदेशात शिक्षणासाठी तयारी' या व्याख्यानाचे आयोजन**


आंतरराष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त, जीवका क्लब, जैवरसायनशास्त्र विभागातर्फे २४ जानेवारी रोजी दुपारी ४.०० वाजता 'उडान – परदेशात शिक्षणासाठी तयारी' या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सुचित्रा सुर्वे, संचालिका, ग्रोथ सेंटर (आय) प्रायव्हेट लिमिटेड, भारत यांना या कार्यक्रमासाठी अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

जैवरसायनशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका कु. मीतली चिन्नकर यांनी सूत्रसंचालन केले. अतिथींचा औपचारिक परिचय जैवरसायनशास्त्रविभागाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. ऋचा कासार यांनी केला.

सुचित्रा सुर्वे यांनी त्यांच्या भाषणात यूके, यूएसए सारख्या विविध देशांमध्ये अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्याने कोणते मूलभूत निकष पूर्ण केले पाहिजेत याचे स्पष्टीकरण दिले. कॅनडा, जर्मनी, ऑस्ट्रेलिया इ. त्यांनी नमूद केले की, बहुतेक देशांसाठी १६ वर्षांचे शिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच GRE, TOEFL, IELTS सारख्या परीक्षांमध्ये चांगले गुण मिळवणे आवश्यक आहे. त्यांनी परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळविण्याच्या टाइमलाइन स्पष्ट केल्या.

सुचित्रा सुर्वे यांनी विद्यापीठांना अर्ज करण्याची संपूर्ण प्रक्रिया, अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे, अर्ज शुल्क इत्यादी तपशीलवार माहिती दिली. त्यांनी व्हिसा प्रक्रिया आणि त्यासंबंधित कागदपत्रांचाही उल्लेख केला. या सत्रात विविध संस्थांमधील १०२ व्यक्ती उपस्थित होत्या.



**ग्रंथालय विभागातर्फे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी, मराठी दिवस आणि विज्ञान दिवस साजरा**

ग्रंथालय विभागातर्फे २६ फेब्रुवारी २०२२ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी सावरकरांच्या एकूण कार्याचा थोडक्यात आढावा सादर केला, तसेच उपप्राचार्य डॉ. मैत्रेयी साहा यांनी त्यांच्या अंदमान येथील सेल्युलर जेलला भेट दिलेल्या आठवणी मांडल्या.




मराठी भाषा दिवस व राष्ट्रीय विज्ञान दिवस या दोन्ही दिवसाचे औचित्य साधून २८ फेब्रुवारी २०२२ रोजी ग्रंथालय विभागातर्फे पुस्तक व माहिती प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. युनायटेड नेशन्सने २०२२ हे वर्ष International Year for Sustainable Development म्हणून घोषित केले आहे व यावर अधिक माहिती प्रसारित करण्याच्या दृष्टीने याविषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन, तसेच कुसुमाग्रज लिखित पुस्तकं व कविता संग्रहांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.

सन १९२२ रोजी नील्स वोहर व फ्रान्सिस टसन यांना भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयाचे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले होते, याबद्दल या दोन्ही शास्त्रज्ञांच्या संशोधनाबद्दल माहिती प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले होते.




**मराठी भाषा दिवस व राष्ट्रीय विज्ञान दिवस**

### ठाणे गौरव पुरस्काराने सन्मानित बांदोडकर महाविद्यालयाचे प्राध्यापक

बा. ना. बांदोडकर कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील प्रा. अनिल आठवले, हिंदी विभाग प्रमुख आणि पदवी



महाविद्यालयातील डॉ. अनिता गोस्वामी-गिरी, रसायनशास्त्र विभाग प्रमुख यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन ठाणे महानगरपालिके तर्फे ठाणे गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### प्रथम वर्ष विधी प्रवेश प्रक्रिया

प्रथम वर्ष विधीच्या प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या दोन फेऱ्या दिनांक १ ते ४ फेब्रुवारी व दिनांक १५ ते १८ फेब्रुवारी रोजी पार पडल्या. आवश्यकतेनुसार महाविध्यालायातील मेरीट लिस्ट दिनांक १४ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आली. शेवटच्या दोन वर्गाची (क आणि ड) शिकवणी दिनांक २५ फेब्रुवारी रोजी ओरिएन्टेशन सुरू करण्यात आली. शेवटच्या ४४ राहिलेल्या जागांकरिता महाविध्यालायास २८२३ अर्ज प्राप्त झाले.

### आभासी / प्रत्यक्ष वर्ग (ऑनलाईन/ऑफलाईन)

मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयात आभासी / प्रत्यक्ष (ऑनलाईन/ऑफलाईन) दोन्ही पद्धतीने वर्ग दिनांक ५ फेब्रुवारी पासून सुरू करण्यात आले. दिनांक १ ते ४ पर्यंत सितच्या वेळापत्रकानुसार दुसऱ्या फेरीतील प्रवेश प्रक्रिया चालू असल्याने सदर वर्ग ५ फेब्रुवारी पासून सुरू करण्यात आले.

### बार कौन्सिल ऑफ इंडिया मान्यता

दिनांक ७ फेब्रुवारी, २०२२ रोजी महाविद्यालयास २०१० ते २०२१ ह्या कालावधीसाठी बार कौन्सिल ऑफ इंडिया तर्फे मान्यता प्राप्त झाली. २०२१-२०२२ ह्या कालावधीच्या मान्यतेसाठी महाविद्यालयान ३.५ लाख रुपयांसहित योग्य ती प्रक्रिया १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी पूर्ण केली.

### सर्टिफिकेट प्रोग्राम

प्राणी संरक्षा कायदा सर्टिफिकेट प्रोग्राम दुसरी बॅच दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी सुरू करण्यात आली, १९ विद्यार्थ्यांनी ह्यात आपला सहभाग नोंदवला आहे. मिडिया व कायदा ह्या संदर्भातील सर्टिफिकेट प्रोग्राम ह्या वेळी घेता येणे शक्य नाही. प्रमुख वक्त्या श्रीमती रीना पिल्लई ह्या त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव सदर कोर्स साठी वेळ देऊ शकत नाहीत. -२ क्रेडिट सर्टिफिकेट प्रोग्राम जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या सोबत घेण्याचे ठरवण्यात आले असून कायदा, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान ह्या विषयातील कोर्स शैक्षणिक वर्ष २०२२ पासून सुरू होईल.

### महाविद्यालयातील इमारत चित्र / रंगकाम




महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव वर्षाचे निमित्त साधून महाविद्यालयाच्या इमारतीचे रंगकाम करण्यात आले आहे. त्यासोबतच इमारतीच्या दर्शनीय भागावर संविधान उद्देशिका महाविद्यालयाचे नाव व कायदा शिक्षणातील ५० वर्षे असे चित्रित करण्यात आले आहे. मदतीसाठी महाविद्यालय मंडळाचे आभार व्यक्त करीत आहे.

### ग्रंथालयातील नवीन पुस्तके

लॉ रेलटिंग तो वूमन अँड चिल्ड्रेन, एस. सी. त्रिपाठी,

मॉडर्न लॉ ऑफ इन्शुरन्स ऑफ इंडिया, के. एस. एन. मूर्ती

लीगल डराफ्टींग, राजाराम रेतावडे

### पेपर पब्लिकेशन

• विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचा आर्टीफिसिअल इंसेमीनेशन अँड राईट अगेनस्ट कृएलटी टू ऍनिमल (Artificial Insemination and Right against Cruelty to Animals) ह्या शीर्षकाचा पेपर करंट तामिळनाडू केसेस ऑनलाईन जर्नल मध्ये प्रसिद्ध झाला.
http://ctclibrary.com/blogpage/?id=MTilMjl4

• विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या पेपरचे शीर्षक असलेले प्रोटेक्टशन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्सयुअल अस्सलट - रेसेन्ट कॅलरीफिकेशन बाय सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया १२ आणि १३ ऑक्टोबर २०२१ मधील आधुनिक थमीझ संशोधनाचा विशेष अंक (ISSN: 2321-984X) p.198-205 (त्रैमासिक आंतरराष्ट्रीय बहुपक्षीय तमिझ जर्नल) या फेब्रुवारी २०२२ मध्ये प्रसिद्ध झाला.

### एम.पी.एस.सी. परीक्षा (MPSC Exam.)

विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालय हे एम.पी.एस.सी.च्या परीक्षेचे केंद्र होते. दिनांक २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी येथे परीक्षा संपन्न झाली. यावेळेस

सारासार विचार करून विवेकाने प्रत्येक गोष्टीचा निर्णय घेतल्यास यशप्राप्ती होते.

महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षेतर कर्मचारी कर्तव्यधित होते.

**वाहतूक नियमावलीचा प्रचार**

विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालयाचे विधी सहाय्यक कक्षाच्या माध्यमातून वाहतूक नियमावली संदर्भ बॅनर प्रसिद्ध करण्यात आले. विधी सहाय्यक कक्ष वेगवेगळ्या माध्यमातून कायदा जागृती अभियान राबवित असते.



**विवाद निराकरण सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ (MSME) संबंधी व्याख्यान**

दिनांक २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी विधी महाविद्यालयाने विवाद निराकरण सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ या विषयावर प्रो. यतीन पंडित यांचे व्याख्यान आयोजित केले होते. ऑनलाईन व्याख्यानात त्यांनी MSME कायदा २००६ अंतर्गत असलेले विवाद निराकरण व्यवस्था यावर ही मार्गदर्शन केले.

**विधी महाविद्यालयाचे सरोगसी आणि एआरटी (असिस्टेड रिप्रोडक्टीव्ह तंत्रज्ञान) वरील वेबीनार संपन्न**



विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे यांनी सरोगसी कायदा याविषयावर वैद्यकीय व कायदेशीर असा दोन्ही विषयानुरूप वेबीनारचे आयोजन दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी केले होते. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त व प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. महेश बेडेकर यांनी 'सरोगसी आणि एआरटी (असिस्टेड रिप्रोडक्टीव्ह तंत्रज्ञान)' या विषयावर वैद्यकीय दृष्टीने मार्गदर्शन केले. सदर वेबीनार मध्ये डॉक्टर बेडेकर यांनी या कायद्यांकडे बघण्याचा डॉक्टरांचा दृष्टिकोन मांडला. अपत्यहिन असण्याचे अनेक वैद्यकीय व संबंधित कारणाचाही यावेळी उल्लेख करण्यात आला. ठाण्यातील प्रसिद्ध प्लास्टीक सर्जन डॉ. सुयश पाटणकर यांनी सरोगसी अधिनियम २०२१ याविषयावर मार्गदर्शन केले. जानेवारी २०२१ मध्ये भारत सरकारने सरोगसी आणि कृत्रिम गर्भधारणा यावरती दोन कायदे पास केले. या कायद्यांचा प्रमुख उद्देश सरोगेट माता आणि मुले यांचे हितसंबंध जपणे आणि या व्यवसायामध्ये असलेल्या अनैतिकतेला पायबंद घालणे असल्याचे डॉक्टर सुयश पाटणकर यांनी सांगितले. या नवीन कायद्यांमध्ये काय प्रावधान आहेत आणि त्यांचे उद्देश आणि कमतरता याचे विश्लेषण केले.

प्रसिद्ध भुलतज्ज्ञ डॉ. महेश बर्वे यांनी देखील यावेळेस सरोगसी आणि एआरटी (असिस्टेड रिप्रोडक्टीव्ह तंत्रज्ञान) या विषयावरील कायदेशीर बाजू समजावून सांगितल्या. डॉक्टर बर्वे यांनी २०२१ पूर्वी याविषयी कायद्यांची परिस्थिती आणि या नवीन कायद्यांची आवश्यकता नमूद केली. सरोगेसी व्यवसाय म्हणून स्वीकारता येणार नाही. अपत्यहिन जोडप्याचा हिताचा विचार करून हा कायदा निर्माण करण्यात आला आहे. एका महिलेला तिच्या आयुष्यात फक्त एकदाच सरोगेट आई होता येणार व तसेच या कायद्याच्या तरतुदीचा भंग केल्यास काय शिक्षा आहेत, त्याचीही माहिती यावेळी

देण्यात आली. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जया कुमार यांनी वक्त्यांची ओळख व वेबीनारचा उद्देश सांगितला. गुगलमिट या डिजिटल प्लॅटफॉर्मवर सदर वेबीनारचे आयोजन करण्यात आले होते.

**मराठी भाषा गौरवदिन कार्यक्रम**

मराठी भाषा गौरवदिनानिमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालय आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेशीर जागृतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कायद्याची माहिती मराठी भाषेतून नागरिकापर्यंत पोहचावी हा उद्देश समोर ठेऊन मराठी भाषा गौरवदिनाचे निमित्त हा योग साधता आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी कार्यक्रमाचे उदघाटन केले. श्री. एम आर देशपांडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. यावेळी तीन विषयांवर जागृती अभियान करण्यात आले. ठाणे येथील तहसीलदार श्री. दिनेश पैठणकर यांनी आई-वडील आणि वरिष्ठ नागरिक निर्वाह आणि कल्याण अधिनियम, २००७ या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. पैठणकर यांनी त्यांचे अनुभव यावेळी व्यक्त केले आणि कशाप्रकारे वरिष्ठ नागरिक न्यायालयास विनंती अर्ज दाखल करू शकतात आणि निर्वाह आणि कल्याणचा आदेश प्राप्त करू शकतात याची माहिती दिली. उच्च न्यायालयाचे अधिवक्ता श्री. अभिजित सावंत यांनी तृतीयपंथी यांच्या समस्या आणि कायदेशीर समाधान यावर मार्गदर्शन केले. संविधानाने आणि इतर कायद्याने त्यांना दिलेल्या अधिकाराची माहिती यावेळी देण्यात आली. उच्च न्यायालयाचे अधिवक्ता श्री. अरुण गायकवाड यांनी माहितीचा अधिकार याविषयावर मार्गदर्शन केले. अर्ज करण्यापासून अपील करण्यापर्यंत आणि कोणती माहिती घेता येते आणि कोणती नाही यावर ही सखोल माहिती देण्यात आली. सेंट जॉर्ज इस्पितळाचे डॉ. रजत यांनी देखील यावेळेस लिंगबदल ऑपरेशनचे वैद्यकीय आणि इतर नियमाची थोडक्यात माहिती दिली. प्रा. विनोद वाघ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले. हा कार्यक्रम गुगल मीट या मंचावर घेण्यात आला होता. जवळपास १५० विद्यार्थी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**विधी महाविद्यालयाचा पदवीप्रदान सोहळा सपंन्न**



विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालयामध्ये मंगळवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२२ रोजी २०२०-२०२१ मध्ये विधी पदवी यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान सोहळा संपन्न झाला. वि.प्र.म.च्या व्यवस्थापन महाविद्यालयातील पाणिनी सभागृहात हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणुन ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश श्री. अभय मंत्री साहेब त्यांच्या पत्नी श्रीमती स्वाती मंत्री याच्या समवेत उपस्थित होते. ठाणे जिल्हा विधी सेवा प्रधिकरणाचे सचिव व वरिष्ठ न्यायाधीश श्री. एम आर देशपांडे ही या सोहळ्यास उपस्थित होते. ठाण्यातील सुप्रसिद्ध वकील व महाराष्ट्र आणि गोवा बार कॉन्सिलचे अध्यक्ष श्री. गजानन चव्हाण, तसेच ठाण्यातील प्रसिद्ध वकील श्री. सुनिल परांजपे हे ही यावेळेस उपस्थित होते. श्री. मंत्री साहेब यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी तालुका, जिल्हा न्यायालयापासून वकीली व्यवसाय सुरू करावा जेणे करून वकीली व्यवसायाचे बारकावे लक्षात येतील असा सल्ला दिला. श्री. देशपांडे साहेबानी विधी सहाय्य

प्राधिकरण व विधी साक्षरेतेमध्ये विद्यार्थ्यांनी बजावलेल्या भूमिकेचे कौतुक करत हा व्यवसाय गंभीरपणे घेण्यास सांगितले. श्री. चव्हाण यांनी मार्गदर्शन करतांना असे सांगितले की, वकीलानी अशिलास परमेश्वर मानून प्रामाणिक त्याच्या केसचा अभ्यास करावा व त्याला न्याय द्यायचा प्रयत्न करावा. श्री. सुनिल परांजपे हे विधी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेचे 'विधीबंध' अध्यक्ष या नात्याने मार्गदर्शन करताना वकीली व्यवसाय हा पवित्र व्यवसाय असून याचे पावित्र्य आपण जपायला पाहिजे असा सल्ला दिला. विप्रमंचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनीही विद्यार्थ्याना संदेश देताना सांगितले की, मागील ५० वर्षात या विधी महाविद्यालयाने अनेक नांमाकित वकील, न्यायाधीश दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी कठीण परिश्रम करून विधी व्यवसायाच्या माध्यमातून समाजाची व देशाची सेवा करावी.

जवळपास ११० विद्यार्थी यावेळेस त्यांची पदवी मान्यवरांच्या हस्ते स्वीकारण्यासाठी उपस्थित होते.

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार, यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर प्रा. विनोद वाघ यांनी सूत्र संचालन व आभार व्यक्त केले. प्रा. रश्मी नाटेकर व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही यावेळी खूप मेहनत घेतली.

### सह संचालक ऑनलाईन बैठका

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार या खालील बैठकांना उपस्थित होत्या. ह्या सन्मानित सहसंचालक यांनी बोलावल्या होत्या.

३ फेब्रुवारी २०२२ सेवानिवृत्ती बचत योजना (National Pension Scheme)

६ फेब्रुवारी २०२२ - NAAC - विद्यालयांची सशर्त मान्यता (NAAC Provisional -ccreditation of Colleges) ह्या बैठकीला सौ. शीतल सोनावणे (ग्रंथपाल) ह्या उपस्थित होत्या.

### निकाल

तिसऱ्या सत्राचे निकाल (3rd Sem LL.B.) आणि पुनर्मूल्यांकन जाहीर करण्यात आले. त्याचप्रमाणे पाचव्या सत्राचा निकाल दोन्ही ६०:४० आणि १०० मार्क पॅटर्नचे ऑनलाईन सबमिशन विद्यापीठाकडे ४ फेब्रुवारी २०२२ ला करण्यात आले.

### विधीबंध बैठक

दिनांक १२ फेब्रुवारी, २०२२ रोजी संध्याकाळी ५.३० व विधिबंध बैठक स्टाफरूम मध्ये घेण्यात आली. ह्या बिथाकीत महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाबाबत नियोजन करण्यात आले. खालील मुद्यांचे अन्वेषण करण्याचे ठरले.

१. आपल्या महाविद्यालयाचे कोणते विद्यार्थी न्यायिक अधिकारी झाले ह्याचा शोध घेणे.

२. आपल्या महाविद्यालयाचे कोणते विद्यार्थी वरिष्ठ वकील झाले ह्याचा शोध घेणे.

३. माजी विद्यर्थ्यांची बॅच प्रमाणे बिथाका घेणे.

४. स्मरणिका बनवणे.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

१) विद्यावर्धिनी भाऊसाहेब वर्तक पॉलिटेक्निकने १६ ते १८ फेब्रुवारी २०२२ दरम्यान ''आजादी का अमृत महोत्सव, नदी को जानो, आत्मनिर्भर भारत'' या विषयांतर्गत ''Conservation of Natural Resources'' या विषयावर ३ दिवसीय राष्ट्रीय ''Online Faculty Development Programme (FDP-2022)'' आयोजित केला. सदर कार्यक्रमाला डॉ. सौ. गीताली इंगवले, सौ. सुरभी श्रॉफ, सौ. ऋतुजा कांबळी व गिथी पी यांनी सहभाग दर्शविला.

२) २८ फेब्रुवारी हा दिवस विज्ञान दिवस म्हणून साजरा होतो. या दिवसाचे औचित्य साधून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ''Innovation Council'' या विभागाने इलेक्टीकल पॉवर सिस्टीम, इंडस्टील इलेक्ट्रॉनिक्स व इन्स्ट्रुमेन्टेशन विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वेबिनार आयोजित केला.

श्रीयुत श्रीकांत बळवंत पटवर्धन (इलेक्ट्रीकल इंजिनिअर) यांनी ''Integration of Science and Technology for sustainble growth'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना Waste Management, waste to wealth, waste to energy व Social Entrepreurnship या विषयांवर विविध उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले.

३) २७ फेब्रुवारी हा दिन मराठी दिन साजरा केला जातो. तंत्रनिकेतनातील ग्रंथालयात नामवंत लेखक व लेखिकांच्या पुस्तकांचे प्रर्दशन आयोजित केले. कुसुमाग्रजांच्या स्मृतीस अभिवादन करून या प्रदर्शनाला तंत्रनिकेतनातील शिक्षक व शिक्षकेतर वर्ग व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास सहभागी होते.

४) ISTE Chapter VPM's Polytechnic व Library & Information Centre यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च हा जागतिक महिला दिन प्रख्यात महिला लिखित साहित्याचे प्रदर्शन आयोजित करून आगळा वेगळ्या पद्धतीने साजरा केला. तंत्रनिकेतनातील शिक्षक व विद्यार्थी वर्गाने या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

**५) कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग**

अ) सौ. गौतमी पुजारे यांनी Testbook Skilled Campus Program आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात (How to Build Successful Relationship with corporates व Linkedin profile Building for TPO) दिनांक ७ मार्च २०२२ व २६ फेब्रुवारी २०२२ रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभाग घेतला.

**ब) अतिथी व्याख्यान**

कॉम्प्युटर इंजिनिअरींग विभागाच्या विद्यार्थ्यांनी खालील व्याख्यानाचा लाभ घेतला. ८ मार्च २०२२ रोजी आयोजित केलेल्या Career Counseling by Edwise overseas Education; ५ मार्च २०२२ रोजी ''Boot-Campon "Data Analytics" by Skilled Academy Campus Program'' या शीर्षकाच्या अंतर्गत श्री. विष्णू मुरली यांच्या व्याख्यानाला ५० विद्यार्थी उपस्थित होते. २ मार्च २०२२ रोजी ''Mock Group Discussion'' या रोशनी अघारिया यांच्या व्याख्यानाला ७५ विद्यार्थी उपस्थित होते. दिनांक २६ फेब्रुवारी २०२२ रोजी ''Boot Camp on "Full Steek Development" by Skilled Academy Campus'' कार्यक्रमात अंशुल श्रीवास्तव यांच्या व्याख्यानाला ५५ विद्यार्थी उपस्थित होते.

क) शिवानी बोडके (द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) या विद्यार्थीनीला RYLA (Rotary Youth Leadership Award) या कार्यक्रमात Miss RYLA या शीर्षकाने विजयी ठरली. सदर कार्यक्रमात २० विद्यार्थी उपस्थित होते.

ड) ISTE (New Delhi) व BNY MELLON यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या Skill Development Training Program मध्ये (२३-१२-२०२० ते २४-२-२०२१) Artificial Intelligence And Machine Learning या कार्यक्रमात सौ. सुहासिनी शुक्ल (विभागप्रमुख) या Proficiency प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

**६) Rotary Youth Leadership Award 2022**

IICC (Institution Innovation Council) व्ही.पी.एम. तंत्रनिकेतन व रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी

इस्टेट यांच्या संयुक्त विद्यमाने 'RYLA 2022' हा कार्यक्रम दिनांक ५ मार्च २०२२ रोजी आयोजित केला.

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रोत्साहन, स्फूर्ती व तरुण विद्यार्थी वर्गात नवीन संकल्पना व उत्तम संज्ञानात्मक क्षमता विकसित करण्यासाठी 'रोटरी युथ लिडरशिप ॲवार्डस्' हा कार्यक्रम आयोजित केला जातो. सदर कार्यक्रमात नवीन संकल्पना व शोध आत्मसात करणे, करिअर मार्गदर्शन, प्रेरणा अशा विविध स्तरावर नवीनता व खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमात तंत्रनिकेतनातील १२० विद्यार्थी व ६ शिक्षकांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाला District Governor of 3142 (डॉ. मयुरेश वारके) यांनी आपल्या प्रेरणादायी संभाषणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले.

सदरच्या कार्यक्रमात -

१) Prz. Rtn. नसीर उस्मान शेख यांनी ''Innovation Adaptation induced by COVID''

२) Rtn. Mohit Agarwal यांनी ''Interview Techniques''

३) के. एच. सुब्रह्मण्यम यांनी ''Product Development - concept to Market Lauch''

४) Rotractor श्री. राहेश दोन्ये यांनी ''Time Management Motivation व लिडरशिप ॲण्ड स्कील्स''

५) श्री. सतीश भोजने यांनी खेळांचे आयोजन केले त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नवीन संकल्पना प्रेरीत व्हायला मदत झाली.

सदर कार्यक्रमाचा शेवट ''Rotary Youth Leadership Awards'' या कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरणाने झाला.



आयुष नकाशे (I.F. Department) व शिवानी बोडके (कॉम्प्युटर इंजिनिअरिंग) यांना Mr. & Ms. RYLA म्हणून सन्मानित केले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**फेब्रुवारी २०२२ मधील कार्यक्रम / वार्ता**

३ फेब्रुवारी : डॉ. कंचन यांनी जर्नल क्लब सभेमध्ये 'Teacher's as Entrepreneurs' या शीर्षकाचा एक शोधनिबंध सादर केला.

३ फेब्रुवारी : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या आय. आय. सी. समितीतर्फे प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी वायरलेस कम्युनिकेशनचा वैज्ञानिक शोध ज्याने जागतिक अर्थशास्त्र बदलले या विषयावरील डॉ. सुधाकर आगरकर आणि डॉ. नीतिन जोशी यांचे ऑनलाइन तिथी सत्र आयोजन केले.

५ फेब्रुवारी : डॉ. व्ही. एन. ब्रिम्स (BRIMS) तर्फे शनिवार दिनांक ५ फेब्रुवारी २०२२ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेने सर्व जाणकार, अनुभवी आणि महत्त्वाकांक्षी व्यक्तिमत्त्वांना त्यांच्या ज्ञानाची आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी एकत्र येण्याची संधी दिली. परिषदेचे विषय सूत्र होते 'व्यवस्थापन शिक्षण : अवलंबन, विश्लेषण, मूल्यांकन आणि निर्माणाद्वारे सुसंगतता.' ('Management Education : Being Relevant through Applying, Analysing, Evaluating and creating') विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक सदस्य, उद्योग क्षेत्रातील

तज्ज्ञ आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ असे दोनशेहून अधिक जण या परिषदेमध्ये सहभागी झाले.

ISDC ग्लोबल, लंडनच्या शिक्षण विभागाचे देश धोरण सल्लागार, प्रा. डॉ. आनंद के. जोशी, हे परिषदेचे प्रमुख पाहुणे म्हणून व मलेशिया विद्यापीठाच्या लिंकन युनिव्हर्सिटी कॉलेजचे अध्यक्ष, डॉ. अमिया भौमिक सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहिले तर क्रेआ विद्यापीठाचे प्र-कुलगुरू व कॉग्निझंटचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. रामकुमार राममूर्ती यांचे बीजभाषण झाले.



**प्रा. डॉ. आनंद के. जोशी**



**श्री. रामकुमार राममूर्ती**



**डॉ. अमिया भौमिक**

डॉ. व्ही. एन. ब्रिम्सचे संचालक, डॉ. नीतिन जोशी, यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात 'ब्लूम वर्गीकरण' (Bloom's Taxanomy) आणि त्याचा वास्तविक जीवनातील उपयोग, तसेच घटनात्मक मूल्ये, विद्यार्थी, शिक्षक आणि संस्था यांची व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाची भूमिका, तसेच शून्य दोष संकल्पना इत्यादी संदर्भात उल्लेखनीय माहिती दिली.



यानंतर महासंचालक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी आपल्या प्रेरणादायी व्याख्यानामध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रमुख भागधारक या नात्याने विद्यार्थ्यांना, आपल्या कारकिर्दीसाठी असलेले, पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य, प्राचीन भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन, व्यावसायिक यशामध्ये मूल्यांची भूमिका यावर भर दिला.



डॉ. व्ही.एन. ब्रिम्सचे वार्षिक प्रकाशन असलेल्या 'सृजन' (ISSN 2456-4079) च्या फेब्रुवारी २०२२ या ७ व्या अंकाचे प्रकाशन करण्यात आले. (मुख्य संपादक डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, सहयोगी संपादक : डॉ. नीतिन जोशी, संपादकीय समिती : डॉ. स्मिता जपे, डॉ. पल्लवी चंदवासकर आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा)



या नंतर आयोजित केलेल्या परिसंवादाच्या कार्यक्रमात प्रख्यात वक्ते आणि धेय करिअर मेंटर्स (आय) प्रा. लिमिटेडचे मास्टर करिअर मेंटॉर आणि ट्रेनर, श्री. समीर आपटे, लीड-लर्निंग सर्व्हिसेस ह्युमन डिझाइन आणि इनोव्हेशन कन्सल्टिंगचे श्री. नलिन पंत, क्रेआ विद्यापीठाच्या विकास विभागाच्या संचालक सुश्री अनुराधा अय्यर, तसेच ईएसजी सल्लागार तसेच व्यवसाय उत्कृष्टता आणि शाश्वत विकास सल्लागार, श्री. कौशिक

मर्चंट या तज्ज्ञ मंडळींनी उद्योगांची गरज असणारे व्यक्तित्व घडविण्यासाठी व्यवस्थापन शिक्षणातील व्यावहारिक दृष्टिकोन या विषयावर त्यांची मते मांडली.

तसेच या परिषदेमध्ये आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा (प्रारंभ) आणि शोधनिबंध सादरीकरण स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले. यामध्ये देखील मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि शिक्षणतज्ज्ञांनी सक्रिय सहभाग घेतला.





हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. परिषदेत देशभरातील उत्साही स्पर्धकांनी भाग घेतला आणि अनेक यतार्थ ज्ञान आणि माहितीपूर्ण वैचारिक चर्चा अशा परिपूर्ण कार्यक्रमा नंतर शेवटी संमेलनाच्या संयोजक डॉ. स्मिता जपे यांनी आभार प्रदर्शन केले.

५ फेब्रुवारी २०२२ : श्रीमती स्वेता नायर आणि प्रा. मुग्धा भडकमकर यांनी ईपीएमबीए २०२२-२३ च्या विद्यार्थ्यांसाठी पात्रता सारांश (रेझ्युमे बिल्डिंग) आणि नियुक्ती प्रक्रिया या विषययावर ऑनलाइन सत्र घेतले.






११ फेब्रुवारी : डॉ. कंचन यांनी रिटेल मॅनेजमेंटवर एका नवीन अभ्यासक्रमाचा आरंभ केला.

१६ फेब्रुवारी : डॉ. व्ही. एन. ब्रिम्स चे प्राध्यापक डॉ. पंकज नंदूरकर व प्रा. विभूती सावे हे सहलेखक असलेली आणि विकास पब्लिशिंग हाऊस प्रा. लि. तसेच मध्य प्रदेश भोज मुक्त विद्यापीठ - भोपाळ यांच्या संयुक्त विद्यमाने खालील अनुक्रमे २ पुस्तके प्रकाशित झाली.

१. पुस्तकाचे नाव : पॅकेजिंग आणि वितरण व्यवस्थापन, सहलेखक-डॉ. पंकज नंदूरकर, ISBN:978-93-5453-400-3

२. पुस्तकाचे नाव : लॉजिस्टिक मॅनेजमेंट, सहलेखिका - प्रा. विभूती सावे, ISBN:978-93-5453-464-5

१८ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या आय आय सी समितीच्या सदस्या डॉ. स्मिता जपे, यांनी 'प्रोसेस ऑफ इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी रेडिनेस लेव्हल' या विषयावर इनोव्हेशन इनक्युबेशन अँड लिंकेज, एसपी पुणे विद्यापीठाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, यांचे वेबिनार आयोजित केले.




२३ फेब्रुवारी : डॉ. नीतिन जोशी, डॉ. स्मिता जपे आणि डॉ. पंकज नंदूरकर यांना वाणिज्य आणि

व्यवस्थापन विद्याशाखा, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई अंतर्गत व्यवस्थापन अभ्यास विषयासाठी विद्या वाचस्पती (पीएच.डी) मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली.

२४ फेब्रुवारी: डॉ. नीतिन जोशी यांनी मुंबई विद्यापीठाने नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समिती (LIC) चे सदस्य म्हणून एस आई ई एस महाविद्यालयाला ला भेट दिली.

२४ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रिम्स च्या आय. आय. सी. समितीतर्फे, 'प्रदूषण नियंत्रण: ग्लॅस्गो, यूके येथे आयोजित केलेल्या COP २६ मध्ये भारताची भूमिका' या विषयावर अतिथी वक्ते डॉ. संजय जोशी यांचे वेबिनार आयोजित करण्यात आले.




२५ फेब्रुवारी : प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी FIIB बिझनेस रिव्ह्यू या स्कोपस अनुक्रमित नियतकालिकासाठी शोधनिबंधाचे समीक्षण केले.

२५ फेब्रुवारी : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी आय क्यू ए सीच्या वतीने, 'व्यवसायाची शाश्वतता आणि सामाजिक प्रासंगिकता' या विषयावर वक्ते श्री. कौशिक मर्चंट यांच्या अतिथी सत्राचे आयोजन केले त्यांनी वास्तव उदाहरणा द्वारे शाश्वतता, अंमलबजावणी विषयी प्रत्यक्ष व्यवहारिक माहिती दिली.




२५ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या आय आय सी समिती तर्फे प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी 'अचिविंग प्रॉब्लेम सोल्युशन फिट अँड प्रॉडक्ट मार्केट फिट' या विषयावर श्री. गिरीश दंडिगे आणि कु. कल्याणी शिंदे यांच्या ऑनलाइन अतिथी सत्राचे आयोजन केले.

२८ फेब्रुवारी : डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या आय आय सी समिती तर्फे 'राष्ट्रीय विज्ञान दिन : स्वातंत्र्योत्तर काळातील विज्ञान आणि तंत्रज्ञान' या विषयावर डॉ. सुधाकर आगरकर यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.




डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या आय आय सी समिती तर्फे डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन या विषयावर भित्तीपत्रक तयार करण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले.

**स्पर्धेचे विजेते :-**



**प्रथम पारितोषिक**
**प्रतीक्षा जगताप**



**द्वितीय पारितोषिक**
**तेजश्री मोकाशी**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.